महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २३१ वे | दिनांक : १७/०८/२०२६ | वार : सोमवार

## १० लाख नागरिकांशी संवाद साधणार; आरोग्यमंत्री आबिटकरांचा उपक्रम



**मुंबई :** राज्यातील आरोग्य व्यवस्था अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि उत्तरदायी करण्यासाठी आरोग्य विभागाच्या विविध आरोग्य समित्यांच्या माध्यमातून थेट नागरिकांशी संवाद साधण्यात येत आहे. आतापर्यंत सहा लाखांहून अधिक नागरिकांशी संवाद साधण्यात आला असून भविष्यात आणखी चार लाख नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेऊन त्यांची सोडवणूक करण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत महिला आरोग्य समिती (MAS), जन आरोग्य समिती (UPHC-UHWC) तसेच रुग्णकल्याण समिती (UCHC) यांच्या सदस्यांशी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी ऑनलाइन पद्धतीने 'जन आरोग्य संवाद' साधला. यावेळी राज्यातील विविध भागांतील आरोग्य सेवांची वस्तुस्थिती जाणून घेत त्यांनी समित्यांच्या कामकाजाचा आणि नागरिकांना मिळणाऱ्या आरोग्य सुविधांचा आढावा घेतला.

या संवादामध्ये आरोग्यमंत्री आबिटकर यांनी समित्यांच्या बैठका नियमित होतात का, रुग्ण दवाखान्यात येतात का, डॉक्टर वेळेवर उपस्थित राहतात का, डॉक्टर रुग्णांशी योग्य संवाद साधतात का, रुग्णालयांमध्ये आवश्यक सेवा उपलब्ध आहेत का, यासह विविध आरोग्य सेवा विषयक बाबींची थेट माहिती घेतली.

'आरोग्य व्यवस्था कागदावर नाही, तर प्रत्यक्ष रुग्णालयात आणि नागरिकांच्या अनुभवातून दिसली पाहिजे,' या भूमिकेतून स्थानिक पातळीवरील अडचणी जाणून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे आबिटकर यांनी स्पष्ट केले.

राज्यात 1,440 डॉक्टर उपलब्ध झाले असून त्यांची नियुक्ती येत्या काही दिवसात करण्यात येणार आहे. तसेच आणखी 600 डॉक्टरांसाठी जाहिरात काढण्यात येत आहे. लवकरच सुमारे 250 दंतचिकित्सक आरोग्य सेवेसाठी उपलब्ध होणार आहेत. राज्याच्या आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकटी देण्यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

नागरिकांना आरोग्य सेवांशी संबंधित तक्रारी व समस्या थेट प्रशासनापर्यंत पोहोचविता याव्यात, यासाठी लवकरच ऑनलाइन पोर्टल कार्यान्वित करण्यात येणार आहे. या माध्यमातून नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्यात येणार आहे.

तसेच स्थानिक बचत गटांच्या माध्यमातून रुग्णांना चांगल्या गुणवत्तेचा सकस व पोषक आहार उपलब्ध करून देण्याची व्यवस्था निर्माण करण्यात येणार असल्याचेही आरोग्यमंत्र्यांनी सांगितले.

या जन आरोग्य संवादामध्ये लोकप्रतिनिधींनीही आरोग्य सेवांबाबतच्या सूचना मांडल्या. माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आरोग्य विभागाशी संबंधित तक्रारींसाठी स्वतंत्र डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्याची तसेच शासकीय दवाखान्यांमध्ये अनुपस्थित राहणाऱ्या डॉक्टरांच्या अनुषंगाने 1 आठवड्यातून एक दिवस निश्चित करून आढावा बैठक घेण्याची सूचना केली. या सूचनेला आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

या ऑनलाइन जन आरोग्य संवादात राज्यमंत्री,आशिष जयस्वाल, माजी मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार प्रकाशदादा सोळंके, आमदार सुरेश धस, आमदार दौलत दरोडा, आमदार किसन कथोरे, आमदार विनोद निकोले, आमदार प्रवीण स्वामी, आमदार राजू तोडसाम, उमेश ऊर्फ चंदू यावलकर, आमदार प्रवीण तायडे, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, आमदार नितीन पवार यांच्यासह विविध ठिकाणचे नगराध्यक्ष, आरोग्य समित्यांचे पदाधिकारी व सदस्य ऑनलाइन सहभागी झाले.

यावेळी सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव-2 श्री. ई. रविंद्रन, आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे अभियान संचालक श्री. संजय श्रीपतराव काटकर, आयुक्त, शहरी आरोग्य डॉ. सुनील भोकरे, संचालक डॉ. विजय कंदेवाड, सहसंचालक डॉ. सुनिता गोल्हाईत, कोल्हापूर विभागाचे उपसंचालक डॉ. दिलीप माने तसेच राज्यातील सर्व जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी ऑनलाइन सहभागी झाले.

'निरोगी महाराष्ट्र — सुदृढ महाराष्ट्र' या संकल्पनेत नागरिकांचा थेट सहभाग वाढवून आरोग्य सेवांमधील अडचणी समजून घेणे, त्यावर प्रभावी उपाययोजना करणे आणि प्रत्येक नागरिकाला दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, हा आरोग्य विभागाचा प्रयत्न राहणार असल्याचे आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सांगितले.

## उदय सामंत येणार कळताच चाकण एमआयडीसीत खड्डे बुजवले



**पुणे :** पुण्यातील चाकण एमआयडीसीत (Chakan MIDC) सध्या वाहतूक कोंडी, खड्डे आणि रस्त्यांची दुरवस्था यामुळे उद्योजक आणि कामगार हैराण झाले आहेत. याच त्रासाला कंटाळून 20 लघुउद्योगांनी आपल्या कंपन्या इतरत्र स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरू केल्याचे वृत्त समोर आले आणि राज्यातील राजकारण चांगलेच तापले. अखेर या प्रकरणाची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली असून, उद्योगांच्या समस्या सोडवण्यासाठी पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली 14 सदस्यीय 'उच्चस्तरीय समिती' आणि 'उद्योग तक्रार निवारण कक्ष' स्थापन करण्याचा मोठा निर्णय शासनाने घेतला आहे.

चाकण एमआयडीसीतील या गंभीर समस्येची दखल घेत राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत आज (16 ऑगस्ट) चाकणचा दौरा करत आहेत. त्यांच्या दौऱ्याची माहिती मिळताच प्रशासन आणि कंत्राटदार खडबडून जागे झाले. एरवी रस्त्यांच्या दुरवस्थेकडे डोळेझाक करणाऱ्या यंत्रणेने थेट मध्यरात्री रस्त्यांची डागडुजी सुरू केली. काही ठिकाणी खड्डे बुजवण्यात आले, तर काही ठिकाणी रात्रीच्या अंधारातच रस्त्यालगतच्या साईड पट्ट्या भरण्याचे काम करण्यात आले. त्यामुळे 'मंत्री येणार म्हटल्यावर दाखवली जाणारी ही तत्परता एरवी का दाखवली जात नाही?' असा संतप्त सवाल आता नागरिक करत आहेत.

उद्योजकांच्या तक्रारी दूर करण्यासाठी शासनाने 14 सदस्यीय समिती गठीत केली असून, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी हे या समितीचे अध्यक्ष असणार आहेत. चाकणच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी आणि रस्ते विकासासाठी ९० दिवसांत एकात्मिक कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. चाकण परिसरातील रस्ते दुरुस्ती, वाहतूक कोंडी निवारण, पार्किंग आणि चौकांच्या विकासाची कामे 'फास्ट-ट्रॅक'वर (Fast-track) आणली जातील. उद्योजकांच्या प्रलंबित तक्रारी आणि परवानग्यांमधील विलंबावर वेळेत तोडगा काढण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी विविध विभागांशी समन्वय साधून समितीकडून नियमित आढावा घेतला जाणार आहे.

या मुद्द्यावरून खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. "मी जर राज्याची उद्योगमंत्री असते, तर बातमी लागल्या लागल्या तिथे धावून गेले असते," असे सुळे म्हणाल्या. त्या पुढे म्हणाल्या, "आंध्र आणि तेलंगणाचे उद्योगमंत्री उद्योजकांसाठी 'रेड कार्पेट' घालत आहेत, आणि आपल्याकडे उद्योग टिकवण्याकडेच दुर्लक्ष होत आहे. सरकार म्हणते उद्योग बाहेर गेले नाहीत, फक्त बंद कंपन्यांची नोंद रद्द झाली आहे. जर उद्योग गेले नसतील, तर तिथल्या रस्त्यांवर रोज दिसणारे मोठे खड्डे तरी खोटे आहेत का? प्रश्नांना बगल देणे म्हणजे लीडरशिप नाही, तर जबाबदारी घेऊन प्रश्न सोडवणे म्हणजे खरी लीडरशिप असते," असा टोला त्यांनी लगावला. उशिरा का होईना, पण आता सरकारच्या या नव्या निर्णयामुळे आणि उच्चस्तरीय समितीच्या स्थापनेमुळे चाकण एमआयडीसीतील उद्योजकांचे आणि कामगारांचे प्रश्न खऱ्या अर्थाने मार्गी लागतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ ऑगस्ट २०२६


## प्राचार्य डॉ अस्वले यांच्या AI अधारित सेंद्रिय शेती उत्पादन मार्केटिंग डिव्हॉइस ला पेटंट



**मुरुम (प्रा. सुधीर पंच्चगल्ले) :** भारत शिक्षण संस्था उमरगा श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले आणि संशोधक विद्यार्थी डॉ खंडू मुरळीकर यांच्या वाणिज्य संशोधन केंद्र आणि महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आयोजित करिअर कट्टा, इन्क्युबेशन सेंटर अंतर्गत पेटंट डिझाईन सर्टिफिकेट मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे, सचिव पद्माकरराव हराळकर, सहसचिव डॉ सुभाष वाघमोडे, संचालक प्रा सुरेश दाजी बिराजदार, सुनील माने, दिगंबरराव बिराजदार यांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले.येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात स्वातंत्र दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात यशस्वी आणि गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. अस्वले यांच्या “AI-ENABLED ORGANIC AGRICULTURAL MARKETING MANAGING DEVICE” या डिझाईन पेटंट मुळे कृत्रिम बुद्धिमत्ताच्या मदतीने सेंद्रिय शेतीमालाच्या विपणनासाठी वापरता येणाऱ्या उपकरणाची रचना संरक्षित होईल तसेच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीमालाची बाजारपेठ शोधणे, खरेदीदार निवडणे, उत्पादनाच्या विक्रीचे व्यवस्थापन, बाजारभावाच्या आधारे निर्णय घेण्यास मदत होणार आहे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ अस्वले यांनी केले.महाविद्यालयाचे वाणिज्य संशोधन केंद्रात 22 संशोधक विद्यार्थी कार्यरत आहेत. डॉ अस्वले यांचे कॉमर्स आणि मॅनेजमेंट शाखेतील एकूण 05 पेटंट आहेत. ग्राहक संबंध व्यवस्थापन (CRM), कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित साठा व्यवस्थापन व नियंत्रण उपकरण (Inventory Control Management) यांचा समावेश आहे. महाविद्यालयाचे वाणिज्य संशोधन केंद्रात त्यांच्या मार्गदर्शनाखाली 15 विद्यार्थी पी एच डी प्राप्त आहेत आणि 06 कार्यरत आहेत त्यामध्ये 04 foreign students आहेत, तसेच 21 विद्यार्थी एम फिल. आणि 06 एम. बी. ए. झाले आहेत. महाविद्यालयात संशोधन केंद्र आणि करिअर कट्टा अंतर्गत इन्क्युबेशन सेंटर, Start-up सेल च्या माध्यमातून पेटंट साठी महाविद्यालयीन प्राध्यापक आणि विद्यार्थी यानी पुढाकार घेतला आहे. याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## श्री सतीश अप्पाराव तुपे यांना पीएच.डी. पदवी प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी श्री सतीश अप्पाराव तुपे यांना मराठी विषयातील "ग्रामीण कादंबरीतील प्रादेशिक जाणीवा : एक अभ्यास"( विशेष संदर्भ- रा.रं बोराडे, आनंद यादव, सदानंद देशमुख, कृष्णात खोत ) या संशोधन विषयासाठी पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.श्री तुपे यांनी सदर संशोधनकार्य शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाचोड येथील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. संतोष चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले.पीएच.डी. पदवी प्राप्त झाल्याबद्दल श्री सतीश तुपे यांचे जेष्ट साहित्यिक बाबा भांड, आमदार सतिश चव्हाण, उद्योगपती मानसिंह पवार , विनोद पाटील , अभिजित देशमुख, माजी विभागीय आयुक्त भास्कर मुंडे , मधुकर आर्डड , दिलीप शिंदे विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख प्रो. डॉ. दासु वैद्य, प्रा.डॉ. कैलास अंभूरे, सहाय्यक कुलसचिव डॉ. पंजाब पडुळ , प्रतिष्ठान महाविद्यालय पैठण च्या मराठी संशोधन केंद्राचे प्रमुख तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रो.डॉ. सर्जेराव जिगे प्रा. गणेश राठोड व प्राध्यापकवर्ग, संशोधक, शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## फ्लाईंग स्कूल येथे ध्वजारोहण सोहळा उत्साहात संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** फ्लाईंग बर्ड्स प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूल, कन्नड येथे दि. 15 ऑगस्ट रोजी भारताचा 80 वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामदास देशमुख, सेवानिवृत्त मुख्याध्यापक, तसेच श्रीमती सरलाताई देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शाळेच्या शैक्षणिक कार्याचा मुख्य आधार असलेल्या कल्याणी तांगडे थोरात, कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी सायलू यडपलवार यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तिपर व सांस्कृतिक कार्यक्रमांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. पल्लवी गायकवाड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करत संपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रमाची धुरा समर्थपणे सांभाळली.संस्थेच्या अध्यक्षा रंजना वाल्डे यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या उत्तम सादरीकरणाचे कौतुक केले. तसेच सूत्रसंचालक, उपस्थित सर्व पाहुणे, पालक आणि शिक्षकांचे आभार मानले. कार्यक्रमाचे अध्यक्ष रामदास देशमुख यांनी आपल्या स्वखर्चाने सर्व विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वाटप करून त्यांचे कौतुक केले. तसेच श्रीमती करंगळे व कल्याणी थोरात यांनी आपल्या स्वखर्चाने सर्व विद्यार्थ्यांना बिस्किटांचे वाटप केले. पाहुण्यांकडून मिळालेले प्रोत्साहन, बक्षीस वितरण आणि शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे सर्व चिमुकले विद्यार्थी उत्साहित झाले. सर्वांच्या सहकार्याने ८० वा स्वातंत्र्य दिन सोहळा अत्यंत उत्साहात व संस्मरणीय वातावरणात संपन्न झाला.यावेळी उपस्थित सर्व पाहुण्यांचे, पालकांचे, शिक्षकांचे व सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले. तसेच श्रीमती जिबोले, श्री बाविस्कर, विकास काकडे, कबीरदास यडपलवार यांच्यासह समस्त साईबाबा कॉलनीवासीयांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सर्वांच्या सहकार्यामुळे आणि प्रेमामुळे स्वातंत्र्य दिनाचा हा सोहळा आनंददायी, उत्साहपूर्ण आणि अविस्मरणीय ठरल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी दिली.

## क्युरियस किड्समध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** शिवाजीनगर येथील क्युरियस किड्समध्ये १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीत व नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहुल प्रधान होते. प्रमुख पाहुणे म्हणून सचिन रायपत्रीवार (जिंतूर तालुका अध्यक्ष, व्हॉईस ऑफ मीडिया), गणेशराव तायडे काका, एल. के. अंभुरे सर, अजय सोनुने व संजय माहुरकर उपस्थित होते. अजय सोनुने व सचिन रायपत्रीवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी वैयक्तिक गीते, सामूहिक गीत तसेच सामूहिक नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या जयघोषाने भारावून गेला. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन शारदा भराडे यांनी केले, तर वैशाली अग्निहोत्री यांनी उपस्थितांचे आभार मानले. शाळा व व्यासपीठाची आकर्षक सजावट सुनीता घुगे, आरती मांडवघडे, चव्हाण मॅडम, प्रेक्षा कळमकर व रुपाली अंभुरे यांनी केली. स्वाती कदम व स्नेहा बांडे यांनी सुंदर रांगोळी साकारली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी चंद्र प्रधान व धनंजय देशमुख सर यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे संचालक अजय सोनुने, राहुल प्रधान, प्रशांत तायडे व संजय माहुरकर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि स्वातंत्र्याची जाणीव रुजविणारा हा स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ ऑगस्ट २०२६


## संविधान हातात, मनुस्मृती मनात

संविधान हातात घेऊन
लोकशाहीच्या घोषणा देतात,
मनाच्या कोपऱ्यात मात्र
जात-पात जपून ठेवतात.

ओठांवर समतेची भाषा,
कृतीत मात्र भेदाभेद,
माणूस पाहताना आधी जात,
नंतर विचारतात त्याचा वेद.

संविधान हातात,
मनात मनुस्मृती—
मग कशी अमलात येईल लोकशाही?
कसा रुजेल समतेचा विचार?
आणि कशी पेरणी होईल
बंधुभावाची?

ज्याच्या हातात झाडू दिला
त्याच्या हातात पुस्तक का नाही?
ज्याच्या श्रमावर महाल उभे राहिले
त्याच्या घराला छप्पर का नाही?

देवळांच्या कळसावर सोने,
पण झोपडीत भाकरीचा प्रश्न,
धर्माच्या नावाने माणसे जोडण्याऐवजी
धर्मच बनतो कधी माणसांमधली भिंत.

जात गेली म्हणतात
लग्नाच्या वेळी मात्र जात शोधतात,
समानतेचे भाषण करतात
जेवताना मात्र ताट वेगळे ठेवतात.

बाबासाहेबांनी दिलेले संविधान
फक्त पुस्तकात ठेवण्यासाठी नाही,
ते जगण्यासाठी आहे—
माणसाला माणूस म्हणून
उभे करण्यासाठी आहे.

लोकशाही म्हणजे
फक्त मतदानाची शाई नाही,
लोकशाही म्हणजे
शेवटच्या माणसाच्या डोळ्यातील
आशेची ज्योत विझू न देणे.

समता म्हणजे
सगळ्यांना सारखे कपडे नव्हे,
तर कुणाच्याही पायात
अन्यायाची बेडी नसणे.

बंधुभाव म्हणजे
फक्त भाषणातील शब्द नाही,
तर दुसऱ्याच्या दुःखाला
आपले दुःख समजणे.

म्हणून आधी
मनातील जात जाळा,
श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या भिंती पाडा,
माणसामाणसांतला
दुरावा मोडा.

हातात संविधान असू द्या,
पण त्यातील मूल्ये
रक्तात उतरू द्या;
ओठांवर लोकशाही असू द्या,
पण ती कृतीत दिसू द्या.

कारण—
संविधान हातात असून
मनात विष असेल,
तर लोकशाही केवळ मुखवटा ठरेल;

मनात समता उगवली,
माणुसकी फुलली,
तरच या मातीत
खऱ्या लोकशाहीची
पेरणी होईल!

आणि त्या दिवशी
जात विचारणारा प्रश्न मरेल,
धर्माच्या नावावरचा द्वेष जळेल,
माणूस माणसाच्या गळ्यात
माणुसकीचीच मिठी घालेल—

तेव्हाच संविधान
फक्त पुस्तकात नसेल,
ते प्रत्येकाच्या जगण्यात असेल;
तेव्हाच लोकशाही रुजेल, जेव्हा समता फुलेल,
आणि या देशाच्या मातीत
खऱ्या बंधुभावाचे
पीक उगवेल!

**डॉ. बाळासाहेब लिहिणार**
**छत्रपती संभाजीनगर**

# माय छोटा इंग्लिश स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** माय छोटा इंग्लिश स्कूल, जिंतूर येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिवस उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेच्या परिसरात सकाळपासूनच विद्यार्थी, शिक्षक व पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. आकर्षक वेशभूषेत विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत स्वातंत्र्य दिनाचा सोहळा उत्साहात पार पडला.मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहणस्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमास जिंतूर तहसील मंडळ अधिकारी पठाण, ज्येष्ठ पत्रकार रियाज चाऊस तसेच अनीस मौलाना यांची प्रमुख उपस्थिती होती. जिंतूर तहसील मंडळ अधिकारी पठाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास विद्यार्थ्यांसमोर उलगडलाध्वजारोहणानंतर प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व सांगितले. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला संघर्ष, त्याग व बलिदान यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. देशाच्या प्रगतीमध्ये विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची असून, विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच शिस्त, प्रामाणिकपणा, देशप्रेम व सामाजिक जबाबदारीची भावना जोपासावी, असे मार्गदर्शन करण्यात आले.राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि विविधतेत एकता ही भारताची ताकद असून, भावी पिढीने ही मूल्ये जपण्याची गरज असल्याचा संदेशही यावेळी देण्यात आला.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाली दादकार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले ते विद्यार्थ्यांनी सादर केलेले देशभक्तीपर नृत्य, गीते आणि विविध देखावे. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने आपल्या कलागुणांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. देशभक्तीपर गीतांवर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याला पालक व मान्यवरांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली.लहान विद्यार्थ्यांनीही विविध देशभक्तीपर कार्यक्रम सादर करून उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. त्यांच्या सादरीकरणातून देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रभक्तीचा सुंदर संदेश देण्यात आला.मौलाना साद यांच्या देशभक्तीपर गीताने रंगतयावेळी मौलाना साद यांनी देशभक्तीपर गीत सादर करून उपस्थितांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांच्या गीतामुळे कार्यक्रमातील देशभक्तीपूर्ण वातावरण अधिकच भारावून गेले.पालकांची मोठ्या संख्येने उपस्थितीस्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमास शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षकवर्ग व पालकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या पाल्यांचे सादरीकरण पाहण्यासाठी पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी केलेल्या उत्कृष्ट सादरीकरणाचे उपस्थित मान्यवर व पालकांनी कौतुक केले.शिक्षकांच्या नियोजनातून कार्यक्रम यशस्वीकार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना विविध देशभक्तीपर गीत, नृत्य व देखाव्यांची पूर्वतयारी करून देण्यात आली होती. विद्यार्थ्यांनीही सरावातून उत्कृष्ट सादरीकरण करत कार्यक्रमाची शोभा वाढवली.सूत्रसंचालन व आभार प्रदर्शनकार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका मसिरा सिद्दीकी मॅडम यांनी केले. त्यांनी कार्यक्रमातील विविध उपक्रमांची माहिती देत संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रबद्ध पद्धतीने संचालन केले. तर अलीबा मॅडम यांनी उपस्थित मान्यवर, पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांचे आभार मानले.देशप्रेमाचा संदेश देत कार्यक्रमाची सांगतामाय छोटा इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या स्वातंत्र्य दिन सोहळ्यातून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, शिस्त, बंधुभाव आणि सामाजिक जबाबदारीची भावना रुजविण्याचा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे स्वातंत्र्य दिनाचा सोहळा आनंददायी व संस्मरणीय ठरला.“देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच देशप्रेम, एकता आणि जबाबदारीची भावना जपावी,” असा प्रेरणादायी संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ ऑगस्ट २०२६


## मुरूम पतसंस्थेचा स्तुत्य उपक्रम : स्वातंत्र्यदिनी महालिंगरायवाडी व येणेगुर येथे वृक्षारोपण आणि सिमेंट आसन भेट



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने ७९ व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून सामाजिक उत्तरदायित्वापोटी मुरूम परिसरामध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. शनिवारी (ता. १५) महालिंगरायवाडी आणि येणेगुर येथे वृक्षारोपण व सार्वजनिक ठिकाणी सिमेंट आसने (बाक) भेट देण्याचा स्तुत्य कार्यक्रम पार पडला.महालिंगरायवाडी गावात ग्रामस्थांच्या सोयीसाठी पतसंस्थेच्या माध्यमातून सात सिमेंट आसने आणि २८ चिंचाच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवशरण वरानाळे, श्रीशैल बिराजदार, सचिव कमलाकर जाधव, संचालक अमृत वरनाळे, बाबासाहेब पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सिमेंट आसनांचे अधिकारिक हस्तांतरण ग्रामस्थांकडे करण्यात आले. याप्रसंगी महालिंगरायवाडीचे उपसरपंच शाहूराज जाधव, माजी उपसरपंच दत्तू जगताप, प्रवीण जाधव, गोविंद भुसार, विकास जाधव, विलास जाधव, किशोर चव्हाण, हिराजी पवार, बाबुराव रामतीर्थे, पुरुषोत्तम जाधव, श्रीकांत पाटील, बंकट कोंगळे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.येणेगुर येथील प्रसिद्ध गणेश मंदिर व महादेव मंदिर परिसरात धार्मिक आणि पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी विशेष कार्यक्रम झाला. येथील मंदिरांच्या परिसरासाठी आठ सिमेंट आसने तसेच २५ विविध प्रकारच्या प्रजातींच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवशरण वरानाळे आणि इतर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते हा कार्यक्रम पूर्ण झाला. यावेळी येणेगुर येथील बलराम गणेश मंडळाचे अध्यक्ष अमोलकुमार स्वामी, उपाध्यक्ष देवराज बिराजदार, सचिव सिद्धाराम हुलमजगे, सदस्य दयानंद संगशेट्टी, महेश मायनाळे, शिवाप्पा माळी, मल्लिनाथ हुलमजगे, सचिन स्वामी, योगेश पांचाळ आदींसह पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.पतसंस्थेच्या या सामाजिक आणि पर्यावरणीय उपक्रमाबद्दल ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात येत असून, संस्थेच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## आडगाव-बोलठाण रस्त्यासाठी ग्रामस्थांचे पालकमंत्र्यांना साकडे



**कन्नड (अरुण थोरात) :** शेजारच्या जिल्हा, तालुक्यांतील ग्रामीण रस्ते सुस्थितीत असताना लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या उदासीनतेमुळे कन्नड तालुक्यातील ग्रामीण रस्त्यांची वाताहत झाली आहे.कन्नड- नांदगाव- चाळीसगाव तालुक्यांच्या सीमेवर असलेल्या आडगाव जे. येथील ग्रामस्थांना भौतिक सुविधांसह रोजच्या वापरातील असलेल्या आडगाव जे ते बोलठाण (ग्रा.मा.173) या रस्त्यांसाठी गेली तीस ते चाळीस वर्षांपासून संघर्ष करावा लागत आहे. साधा खडीकरणाचा असलेल्या या रस्त्याची अतीशय बिकट अवस्था झाली असून त्यावरतून पायी चालणे ही अवघड बनवे आहे. याबाबत वारंवार तक्रारी, निवदेने देऊण ही प्रशासन व लोकप्रतिनिधी कडून दुर्लक्ष होत आहे. परिणामी ग्रामस्थांची मुख्यबाजारपेठ, शाळा, महाविद्यालय, दवाखाने आसलेल्या बोलठाण ता.नांदगाव येथे जाण्यासाठी रुग्ण, नागरिक, विद्यार्थी, महिलांना जीवमुठीत धरुण जावे लागत आहे. याबाबत ग्रामस्थांनी छ.संभाजीनगर चे पालकमंत्री आ. संजय शिरसाठ यांची भेट घेऊण निवेदन दिले. यावेळी हभप. वाल्मिक जठार, मा.सभापती गणेश शिंदे, दिलीप गायकवाड, संतोष गायकवाड, बाळासाहेब झिमन, काकासाहेब झिमन, ज्ञानेश्वर गायकवाड, भावेश शिंदे, अक्षय झिमन, सुमित पवार आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज, आसेगाव येथे स्वातंत्र्य दिन साजरा



**दौलताबाद (जावेद अहमद) :** स्वतंत्र दिन कार्यक्रमात परदेशी पाहुणे सामीलकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका गीता फाळके होत्या. यावेळी संस्थेचे सचिव रत्नाकर फाळके , प्रमुख पाहुणे म्हणून घाना येथील शैक्षणिक संशोधक व फॅशन डिझायनर श्री. गोडविन काटो तसेच संशोधक व इबंडा युगांडा विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. जेराल्ड कुले, यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी अध्यक्ष बाबासाहेब सोनटक्के, आसेगाव ग्रामपंचायत सदस्य कृष्णा खिल्लारे ,माजी सरपंच समाधान पल्हाळ, प्राचार्य योगेश फाळके, मुख्याध्यापिका रोशनी कांबळे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.


### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ ऑगस्ट २०२६


## फुलंब्री येथे भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

**फुलंब्री** : श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री व संत सावता गुरुकुल यांच्या संयुक्त विद्यमाने पंडीत दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा राज्यस्थान राज्याचे महामहिम राज्यपाल श्री. हरिभाऊ बागडे नाना यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य मॅरेथॉन (मिनीथॉन) स्पर्धेचे आयोजन फुलंब्री येथे दिनांक १७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ठीक ७.०० वाजता करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्धाटन फुलंब्री मतदार संघाच्या आमदार सौ. अनुराधाताई चव्हाण तथा विधानपरिषद सदस्य आमदार श्री. सुहासभाऊ सिरसाठ यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव श्री. निवृत्ती पाटील गावंडे असणार आहेत. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे पालक संचालक प्राचार्य डॉ. प्रदीप जबदे, नगरसेवक, नगरपरिषद फुलंब्री श्री. योगेश मिसाळ, नगरसेवक सुनिल जगताप, जिल्हा संघटनेचे सचिव डॉ. फुलचंद सलामपुरे, डॉ. श्रीनिवास मोतियेले, डॉ. विलास तांगडे, डॉ. लक्ष्मण जाधव, आंतरराष्ट्रीय पंच संजिवनी दिल्लीकर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे बक्षीस वितरण फुलंब्री पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, श्री. प्रताप नवघरे यांच्या हस्ते होणार असून विद्यापीठ अभ्यास मंडळ सदस्य प्रोफेसर, डॉ. बाप्पासाहेब म्हस्के, विद्यापीठ क्रीडा मंडळ सदस्य श्री. सुरेश मिरकर, डॉ. भुजंग डावकर, डॉ. प्रशांत तौर यांची उपस्थिती राहणार आहे.ही मॅरेथॉन स्पर्धा ५ व ३ किलोमीटर मुले व मुलींसाठी आयोजित करण्यात आली असून आयोजन समितीतर्फे प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या खेळाडूंना अनुक्रमे ५ हजार, ३ हजार व २ हजार रुपये कॅश, पदके, व प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत.या स्पर्धेमध्ये आतापर्यंत १०२१ खेळाडूंनी सहभाग नोंदविला आहे. या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केले आहे.ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आयोजन समितीचे सचिव डॉ. संदीप जगताप, उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर, मुख्याध्यापक कल्पना उरणकर, श्री. आप्पासाहेब चव्हाण, डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. विजय पांडे, डॉ. नितीन माळेगावकर, डॉ. संजीवकुमार पांचाळ, डॉ. रामकिसन लोमटे, डॉ. महेश थोरात, डॉ. सुरेश मंढे, डॉ. मंजुषा नळगीरकर, डॉ. राजर्षी पवार, प्रा. दत्तात्रय येडले, प्रेम चव्हाण, बाबासाहेब दाभाडे आदी प्रयत्न करीत आहेत.

## पशुपतेश्वर महादेव मंदिरात उद्या विविध कार्यक्रम




**दौलताबाद (जावेद अहमद) :** शहरा पासून जवळ भांगशीमाता गड शरणापूर छत्रपती संभाजीनगर पायथ्याशी असलेल्या लाल दगडात कोरलेले भव्य असे पशुपतेश्वर महादेव मंदिराचा तिसरा वर्धापन दिन दि १७ ऑगस्ट नागपंचमी श्रावण शुद्ध पंचमी सोमवारी रोजी आहे. या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांसह सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. परमानंदगिरी महाराज यांच्या प्रेरणेतून लाल पाषानात हेमाडपंथी पशुपतेयश्वर महादेव मंदिर बांधण्यात आलेले आहे. या मंदिरात महादेवाची सव्वाचार फुट लांब व सव्वादोन फुट उंच अशी महादेवाची पिंड आहे. भांगशीमाता गडांच्या पायथ्याशी परमानंदगिरी महाराजांची कुटीया व गुरुकुल आहे. येथे शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहेअल्पावधीतच भाविकांमध्ये लोकप्रिय ठरलेल्या या पशुपतेयश्वर मंदिराच्या वर्धापण दिनानिमित्त उद्या सकाळी सात ते दुपारी बारा वाजेपर्यंत रुद्राअभिषेक, रूद्रयज्ञ पार पडणार आहे. दुपारी एक वाजता स्वामी परमानंदगिरी महाराज यांचे प्रवचन, रक्तदान शिबीर, भांगशी गड परिसरात वृक्षारोपण आणि शेवटी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे माहिती मंदिराचे व्यवस्थापक सांडू पवार यांनी दिली आहे.

## पाटोद्याच्या जयभवानी महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा वर्धापन दिन उत्साहात




**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा येथिल जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ,संचलित कला व विज्ञान महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्याचा ८० वर्धापन दिन मोठ्या उत्साहात व विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला.महाविद्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रपिता महात्मा गांधी व राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंडबेडकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या शुभहस्ते विधीवत पूजन करण्यात आले. सकाळी ठिक ८:३० वाजता मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते.तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणुन स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य मा.श्री.दिलीपराव जाधव,व मा.श्री.बप्पासाहेब जाधव यांची उपस्थिती होती.तर व्यासपीठावर नगरसेवक ॲड.सुशील कवटेकर,श्री.बंडू शेवाळे,श्री.नामदेव जाधव,श्री.शाहु रंधवे,श्री.नवनाथ जाधव,श्री.राजेंद्र राऊत,पत्रकार श्री.नानासाहब डिडूळ,श्री.भाऊसाहेब पावसे,पोस्पमास्टर श्री.शिवदास पवळ,श्री.श्रीकांत बुधवंत,श्री.सुभाष पावसे,ह.भ.प. संतोष गर्जे,श्री. कालीदास हराळ,श्री.बाबासाहेब मुळे,श्री.अरुण मठपती आदि मान्यवरांची उपस्थिती होती.विज्ञान मंडळाच्या वत्तीने प्रा.शिवाजी भोरे व प्रा.बाळासाहेब जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली "शोध शास्त्रज्ञांचे " व प्रा. डॉ.गोविंद बामदळे " यांच्या मार्गदर्शनाखाली " गणिताची किमया " व प्रा.बजरंग डिसले यांच्या मार्गदर्शनाखाली " भूगोलातील गमती " तसेच राज्यशास्त्र विभागाच्या " स्वातंत्र्य सेनानी " या भित्तीपत्रकाचे मान्यवरांच्या शुभहस्ते विमोचन करण्यात आले,भव्य रांगोळी स्पर्धेतील विजेत्यांना व गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जंयती निमित्त रक्तदान शिबीरात रक्तदान केलेल्या रक्तदात्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र देण्यात आली.तसेच विद्यार्थ्यांना तंबाखु मुक्तीची शपथ देण्यात आली.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनास्वसंरक्षणासाठी मोफत कराटे प्रशिक्षण देण्यात येते.कराटे प्रशिक्षणाचे चित्तथरारक प्रात्यक्षिक (डेमो) दाखवण्यात आले.या प्रसंगी नगरसेवक ॲड.सुशिल कवटेकर यांनी मनोगत व्यक्त करताना स्वातंत्र्य दिना निमित्त शुभेच्छा !देवुन महाविद्यालयात विविध उपक्रम राबवले जातात या बद्दल महाविद्यालयाचे कौतुक केले.शेवटी अध्यक्षीय समारोप करताना मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी स्वातंत्र्य लढ्यातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान सांगुन त्यांच्या बलिदानातुन हे स्वातंत्र्य मिळाले आहे.हे सांगुन महाविद्यालयाची भूमिका विशद करून स्वातंत्र्य दिनानिमित्त शुभेच्छा!दिल्या.ध्वजारोहन सोहळ्याचे संचलन क्रिडा विभागाचे प्रा. डॉ.प्रविण शिलेदार व प्रा .गोपाळ धांडे यांनी केले.या संपूर्ण कार्यक्रमाचे फेसबुक लाईव्ह प्रेक्षपण सुप्रसिध्द नाटककार प्रा.बापू घोक्षे यांनी केले. या नंतरच्या कार्यक्रमाचे बहारदार संचलन प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी केले व उपस्थित मान्यवरांचे आभार कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे यांनी व्यक्त केले.या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद,शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व बहुसंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT — कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर), पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G. — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN — कालावधी २ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY — कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर), पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ ऑगस्ट २०२६


## दौलताबाद येथे ८० वा स्वतंत्र दिन उत्सवात साजरा झाला



**दौलताबाद (जावेद अहमद)** : ऐतिहासिक दौलताबाद देवगिरी किल्ल्यावर महसूल विभागाचे मंडळ अधिकारी गणेश सोनवणे यांचा हस्ते दुर्गा तोप येथे सकाळी सात वाजता ध्वजारोहण करण्यात आलेदौलताबाद ग्रामपंचायत येथे शबाना रहीम शेख यांच्या हस्ते सकाळी साडेसात वाजता ध्वजारोहण करण्यात आलेदेवगिरी विद्यालय दौलताबाद येथे मुख्याध्यापक इश्वर पाटील यांच्या हस्ते सकाळी आठ वाजता ध्वजारोहण करण्यात आलेप्राथमिक आरोग्य केंद्र दौलताबाद येथे सकाळी साडे आठ वाजता ध्वजारोहण करण्यात आलेजिल्हा परिषद प्राथमिक शाळा दौलताबाद येथे सकाळी साडे आठ वाजता ग्रामपंचायत सदस्य सतीश जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी लेझीम खेळत सुंदर प्रदर्शन केले व काही विध्यार्थीनी राष्ट्रीय गाण्यावर नृत्य सादर केलेयावेळी उपसरपंच सैय्यद मतीन, ग्रामपंचायत अधिकारी किशोर गव्हाने,किल्याचे संरक्षक सहायक निलेश कोळी,महसूल अधिकारी सूरज गिरी,प्रशांत वनकर,भाजपचे शेख बने,रामदास इंगळे,अश्विनी पेरकर,मुख्याध्यापिका तैसीम बाजी,अलावदिन,सैय्यद मोईस विद्यार्थी शिक्षक यांची प्रमुख उपस्थिती होती

## कंटेकुर येथे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : कंटेकुर, ता. उमरगा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन विविध उपक्रमांनी उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, माजी सैनिक, गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, पोलीस पाटील, आजी-माजी पदाधिकारी, शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, सर्व अंगणवाड्यांतील विद्यार्थी व कर्मचारी, आशा कार्यकर्त्या तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले . त्यानंतर राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते व भाषणे सादर करून उपस्थितांमध्ये देशप्रेमाची भावना जागृत केली.यावेळी विद्यार्थ्यांना देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या कार्याची माहिती देण्यात आली. देशाची एकता, अखंडता आणि प्रगती टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांसह उपस्थितांनी व्यसनमुक्तीची शपथ घेऊन व्यसनमुक्त समाज निर्माण करण्याचा संकल्प केला. याशिवाय विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून अर्जुन घोसले यांनी शाळेस फॅन भेट दिले व श्री महालक्ष्मी युवक संघटना, कंटेकुर यांच्या वतीने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धन, स्वच्छ हवा आणि हरित गावासाठी वृक्षारोपणाचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले. युवकांनी मोठ्या उत्साहाने या उपक्रमात सहभाग घेतला.कार्यक्रमानंतर गुंडेराव हनुमंत साखरे, राधा राम कलबुर्गे आणि श्रीकांत विष्णू शिंदे यांच्या वतीने शाळेतील तसेच गावातील तीनही अंगणवाड्यांतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा आनंद घेतला.स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमामुळे शाळेच्या परिसरात सकाळपासूनच उत्साहाचे आणि देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ, युवक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. फोटो ओळ : कंटेकुर, ता. उमरगा येथील जिल्हा परिषद शाळेत ध्वजारोहण प्रसंगी महात्मा गांधी यांच्या प्रथमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना मान्यवर व अन्य.

# पालकमंत्री शिरसाठांसह विविध नेत्यांनी घेतली राजेंद्र दाते पाटलांची भेट



**छत्रपती संभाजीनगर** : शाश्वत मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी विभागीय आयुक्तालयासमोर मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने ज्येष्ठ आरक्षण अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या अन्न त्याग आमरण उपोषणाला रविवारी (दि.१६) आठ दिवस झाले असून प्रकृती खालवत चालली आहे. उपोषणस्थळी शनिवारी पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी भेट देऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. उपोषण सोडण्याची विनंती त्यांनी केली. मात्र, शाश्वत मराठा आरक्षणाचा ठोस निर्णय होईपर्यंत उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार दाते पाटील यांनी व्यक्त केला. त्यानंतर आरक्षणाच्या मागणीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून तोडगा काढण्याचे आश्वासन शिरसाठ यांनी दिले.शनिवार व रविवारी खासदार डॉ कल्याण काळे, माजी खासदार चंद्रकांत खैरे यांच्यासह विविध पक्षांच्या नेत्यांनी डॉ राजेंद्र दाते पाटील यांची भेट घेतली. यावेळी प्रा. माणिकराव शिंदे, प्रा डॉ शिवानंद भानुसे योगेश शेळके, लक्ष्मण बापू शिरसाठ यांच्या सह पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान आठ दिवस उलटूनही प्रशासनाकडून आंदोलनाची ठोस दखल घेतली नसल्याचे डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी पालक मंत्र्यांना सांगितले. मराठा-कुणबी नोंद अथवा वंशावळ नसलेल्या मराठा बांधवांना हैदराबाद गॅझेटिअरच्या आधारे कुणबी जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच एसईबीसी प्रवर्गाला ओबीसीप्रमाणे शिक्षण,नोकरी,शिष्यवृत्ती, शैक्षणिक शुल्क सवलत, वयो मर्यादा व शासकीय योजनांचा लाभ द्यावा, आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली. सारथी संस्थेला पाच हजार कोटी, तर स्व. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला दहा हजार कोटी रुपयांचा निधी द्यावा. प्रलंबित उमेदवारांना तातडीने नियुक्त्या द्याव्यात, तसेच कायगाव येथे मराठा हुतात्मा स्मारक उभारावे, अशा मागण्याही अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी मांडल्या. उपोषणस्थळी प्रा. माणिकराव शिंदे,लक्ष्मण शिरसाठ, प्रा डॉ शिवानंद भानुसे,योगेश शेळके,रवींद्र वाहटूळे, संग्राम जगताप, जगन्नाथ तायडे, हनुमंत कदम, अमोल जामुंदे, रेखा वाहटूळे, तनश्री गायकवाड, अर्चना मोहिते, निखिल काकडे शुभम नवले, आर्यन पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी व आंदोलक उपस्थित होते. गाजर स्वाहा आंदोलन करून व्यक्त केला निषेध उपोषणकर्ते जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांच्या समर्थनार्थ शाश्वत मराठा आरक्षणासाठी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने रविवारी (दि. १६) 'गाजर स्वाहा' आंदोलन करून शासनाच्या फसव्या व निष्फळ निर्णयांचा निषेध करण्यात आला. यावेळी विभागीय आयुक्तालया समोरील उपोषणस्थळी होम करून मराठा आरक्षणा संदर्भातील शासनाचे निष्फळ निर्णय 'स्वाहा' करण्यात आले. या आंदोलनातून मराठा समाजाला आरक्षणाचा ठोस व शाश्वत निर्णय देण्याची मागणी करण्यात आली. प्रकृती खालावल्याने मराठा समाजात आक्रोश दरम्यान, रविवारी उपोषणाचा आठवा दिवस होता. शुगर आणि बीपीचा त्रास एन्जो प्लास्टि शास्त्रक्रिया झालेली असलेल्या डॉ राजेंद्र दाते पाटील यांची प्रकृती दिवसा गणिक खालावत चालली आहे. त्यांची शुगर लेव्हल अत्यंत कमी झाली असून अशक्तपणा वाढला आहे. तसेच इम्युनिटीही कमी झाली असून उपचाराची गरज असल्याचे वैद्यकीय डॉक्टरांनी सांगितले. मात्र, डॉ राजेंद्र दाते पाटील आपल्या उपोषणावर ठाम आहेत. त्यामुळे त्यांची खालावत चाललेली प्रकृती आणि प्रशासनाकडून उपोषणा बाबत ठोस पावले उचलली जात नसल्याने मराठा समाजात आक्रोश निर्माण झाला आहे. या आक्रोशाचा उद्रेक होण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ ऑगस्ट २०२६

# चिकलठाणा शाळेत स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा प्रा.व मा विध्यालय चिकलठाणा शाळेत स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष स.नगरसेवक रविभाऊ कावडे व स.नगरसेविका श्रीमती.वैशालीताई कोरडे तसे गावातील प्रतिष्ठीत नागरीक आणि स.सदस्य उपस्थित होते. शाळा .व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री कैलाजी रिठे यांच्याहस्ते श्रीफळ अर्पण करण्यात आले व माजी नगरसेवक श्री.सोहेल खान यांच्या हस्ते ध्वजारोहण करून विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर मराठी. हिन्दी इंग्रजी भाषेतून विध्यार्थांनी भाषणे केली.त्यानतंर संगीत कवायत ,डंबेल्स कवायत, रंगीत झिरमळे कवायत व ढोल ताशा च्या तालावर लेझीम घेण्यात आली मुख्याध्यापक श्री वसंत राठोड सर यांच्या मार्गदर्शनखाली सर्व शिक्षकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परीश्रम घेतले. सेवक वर्गाचे सहकार्य लाभले, अशा पध्दतीने स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# श्री संत सावता माळी महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**फुलंब्री :** श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रोफेसर डॉ. रामकिशन लोमटे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघांचे अध्यक्ष, श्री अनिल मिसाळ, डॉ. मंदार पाराश्वर उपस्थित होते. तर अध्यक्ष म्हणून माहाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते.बोलत असताना डॉ. लोमटे म्हणाले की, आपल्या स्वातंतत्र्यासाठी अनेकांनी बलिदान दिले तेव्हा कुठे आज आपण स्वाभिमानाने वावरू शकतो. या मिळालेल्या स्वातंत्र्याचा सदुपयोग आपण सर्वांनी करायला हवा. असे मत व्यक्त केले.या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने प्रोफेसर डॉ. दत्तात्रय येडले यांनी उपस्थितांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. याबरोबरच माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला.या स्वातंत्र्य दिन सोहळ्यासाठी महाविद्यालयातील प्रोफेसर डॉ.पांडुरंग कल्याणकर, प्रोफेसर डॉ. राजश्री पवार, प्रोफेसर डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रोफेसर डॉ. सुरेश मुंढे, प्रोफेसर डॉ. संजीवकुमार पांचाळ,प्रोफेसर डॉ.गणेश कुलकर्णी, डॉ. संदीप जगताप, प्रोफेसर डॉ. महेश थोरात, प्रा.डॉ. अंभोरे, श्री प्रेम चव्हाण, श्री बाबासाहेब दाभाडे, श्री विनोद तुपे, श्री रत्नाकर जाधव, श्री रमेश जगधने, श्री जयराम जाधव व अन्य माजी विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

# तेरणा हायस्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** तेरणा हायस्कूल येथे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक श्री. के.पी. पवार यांच्या हस्ते ध्वजारोहणा करण्यात आले.ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, भाषणे, केले .या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उषा उदगे यांनी केले . केशवराव मुंडे, रमेश प्रधान यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.सुत्रसंचलन माधुरी काटकर यांनी केले. यावेळी प्रदीप भाले,रमेश जोशी, भाग्यश्री काळे, दिपाली चांडेमिनाक्षी चौधरी, छाया मॅडम , वर्षा मॅडम, सिंधु बोर्डेयांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक श्री. के.पी. पवार म्हणाले, "देशाच्या विकासासाठी शिक्षण, शिस्त आणि राष्ट्रप्रेम आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे."कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# जालना शहरात तिरंगा रॅली निघाली



**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** जालना शहरात तिरंगा रॅली निघाली, यावेळी जालना महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती वंदना मगरे, उपमहापौर श्री. राजेशजी राऊत, सामाजिक कार्यकर्ते श्री. राजेश देसार, जेइएस महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे, कार्यक्रमाधिकारी प्रा. किशोर तापडिया व नगरसेवक उपस्थित होते.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ ऑगस्ट २०२६


## कॉन्व्हेट शाळेसाठी ध्येयवेडा माणूस



माझे मित्र आयु पुरुषोत्तम.सदाशिवराव जुजगर हे मूळ धुळे जिल्हातील अनुसूचित जमातीचे, पारस येथे रसायनशास्त्रज्ञ म्हणून सन १९८२ ला महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात रुजू झाला. माझी नेमणूक नंतरची चंद्रपूर तर ते पारस येथे नंतर मी बदलून पारस येथे आलो .आम्ही बामसेफ संघटनेत कार्यरत आणि सोबत असताना त्यांनी सन १९९४ - १९९५ दरम्यान पारस येथे एक नव्यानेच कॉन्व्हेन्ट स्कूल सुरू केले .त्यांच्या मिळणाऱ्या माहेवारी पगारातून त्यांनी दोन शिक्षीका नियुक्त केल्या,आणि क्वार्टर खूप मोठे होते.त्यांना त्यांच्या निवासात अकोला जाण्यायेण्याचा खर्च आणि त्रास होऊ नये म्हणून राहण्याची सुद्धा सोय केली. त्यांचा पगार आणि शाळेचं खोलि भाडे,एक सेवाभावी शाळेसाठी स्वच्छता रक्षक माणूस,त्यांचा पगार खर्च आपल्या पगारातून करीत देऊन प्रसंगी.स्वतः काटकसर करीत खिचडी खाऊन दिवस काढले.आज घटकेला या माणसाने पारस ते बाळापूर रोड लगत पाच एकर शेती विकत घेऊन प्रशस्त,दिमाखदार, लक्ष वेधून घेणारी आकर्षित वास्तू उभी केली.आणि पहातपहता ज्युनिअर कॉलेज मान्यताही प्राप्त केली. .आज तेथील विद्यार्थी पटसंख्या आणि शिक्षणाचा दर्जा उत्तम असून खूप चांगला आहे.पूर्ण शाळा भव्य आणि सुसज्ज आणि सर्व सोयियुक्त असून डिजिटल आणि सोलार,क्षारवीरहित असा शुद्ध पाणी ,असे हे मॉडर्न इंग्लिश शिक्षणाचे केंद्र म्हणून नावारूपास आले आहे.मलाही त्यांनी सहभागी होण्यासाठी खूप आग्रह केला.पण ही संधी मी गमावली. आयु जूजगर हे आज सेवानिवृत्त होऊन एक संस्थाचालक आणि मुलांच्या प्रवेश प्रक्रियेत आणि शिक्षक नेमनू किसाठी मुलांच्या प्रवेशासाठी ते लोकात भेटीसाठी गर्दीत आणि गराड्यात असतात.तर आमचे काही सेवानिवृत्त लोक पेल्यात झिंगत आहेत.आयु पुरुषोत्तम सदाशिव जुजगर हे प्रथमपासून बामसेफ संघटनेशी बांधील होते.बरेच कॅडर कॅम्प केले.मान्यवर कांशीराम साहेबाच्या विचाराशी समरस झाले.वाचनातून आणि संवाद संपर्क यातून काही चांगल्या कार्यकर्त्यांशी विचाराची त्यांची तार जुळली आणि त्यामुळे वैचारिक पातळी वाढून बौद्धिक क्षमतेच्या कक्षा रुंदावल्या.ते आज प्रामाणिकपणे कबूल करतात.मी संघटनेमुळे योग्य दिशेने वाटचाल केली.आंबेडकरी विचारधारा आणि अनमोल विचार साठा साहित्य वाचन आणि मान्यवर कांशीराम साहेबाचा त्याग आणि कार्य पाहून मला हा विचार सुचला , उच्ध आणि दर्जेदार इंग्लिश शिक्षणाशिवाय बहिस्कृत समाजाची उन्नती शक्य नाही.विचार हे कृतीत उतरविले आणि घडले.बामसेफ मुले मी,वाईट मार्गावर गेलो नाही,व्यसनाकडे पावले पडली नाही.निकोप विचारच मला दिशादायी ठरले.त्यातून हे कुशल कार्य घडत आहे.कधीकधी परिस्थिती नुरुप गोरगरीब विद्यार्थ्यांकडून ते खूप अल्प फीस घेऊन प्रवेश घेतात.इंग्लिश माध्यम आणि कार्यक्षम, मेहनती आणि सामाजिक जाणीव आणि जीवन संघर्षाची पार्श्वभूमीवर असलेल्या,वैचारिक परिपक्वता असलेल्या शिक्षक आणि शिक्षकेची नेमणूक केलेली आहे. बहुतांशी त्यांनी नोकरीच्या शेवटी मिळालेल्या अमदानी आणि फंड पैशातून हे शाळेचे बांधकाम पूर्ण केले आहे.स्थानिक काही लोकांनी त्यांना त्रासही दिला.बदल्याही केल्या,पण अफाट जिद्द ते टिकले.पण काही लोकांनी या दुर्गम भागात मुलासाठी इंग्लिश माध्यम शिक्षणाचे दालन उभे केले म्हणून पाठिंबा दिला साथ दिली.कारण .अकोल्याला जाण्यायेण्याच्या खर्च आणि मुलाची जबाबदारी, उद्भवणाऱ्या समस्या ह्यामुळे ह्या शाळेस प्रथिमकता दिली.शिस्त,शिक्षण दर्जा,कार्यक्षम शिक्षक वर्ग ,आणि निकाल ह्या बाबीकडे आयु जूजगर साहेब जातीने लक्ष देतात .ते एमएससी . बिएड,एलएलबी ,डी आय पी सी आहेत प्रथमपासून शिक्षणाची आवड आहे.सामान्य आणि गरीब कुटुंबातून आल्यामुळे सामाजिक भान आहे.त्यांच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा,आणि अभिनंदन

**मधुबानंदा प्रधान,**
**अकोला**

## राष्ट्रीय लोक मोर्चाचे राष्ट्रीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर राजगीर येथे



**पाटना :** राष्ट्रीय लोक मोर्चा (RLM) पक्षाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन दि. 20 ते 22 ऑगस्ट 2026 दरम्यान राजगीर, बिहार येथे करण्यात आले आहे. पक्ष संघटन अधिक मजबूत करणे, आगामी निवडणुकांसाठी प्रभावी रणनीती आखणे आणि कार्यकर्त्यांना संघटनात्मक व राजकीयदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरामध्ये देशभरातील पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व निवडक कार्यकर्ते सहभागी होणार असून, प्रत्येक राज्यातील प्रदेशाध्यक्ष किंवा प्रधान महासचिव यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे.राष्ट्रीय लोक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. उपेंद्र कुशवाह जी, बिहार सरकारचे पंचायती राज मंत्री मा. श्री. दीपक प्रकाश जी, पक्षाचे राष्ट्रीय वरिष्ठ उपाध्यक्ष तथा राष्ट्रीय मीडिया प्रभारी मा. श्री. अरविंद वाजपेयी जी तसेच पक्षाचे इतर प्रमुख राष्ट्रीय नेते प्रशिक्षणादरम्यान मार्गदर्शन करणार आहेत.शिबिरामध्ये पक्षाची संघटनात्मक बांधणी, बूथ स्तरापासून संघटन मजबूत करणे, कार्यकर्त्यांची भूमिका, जनसंपर्क वाढविणे, आगामी निवडणुका लढविण्याची तयारी, निवडणूक व्यवस्थापन, प्रचार-प्रसार, सोशल मीडिया रणनीती आणि पक्षाचा जनाधार वाढविण्यासाठी प्रभावी नियोजन याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.महाराष्ट्र राज्यातून मा. श्री. बाबासाहेब पठारे, प्रदेश अध्यक्ष, राष्ट्रीय लोक मोर्चा, महाराष्ट्र प्रदेश आणि मा. श्री. खय्युम खान , प्रदेश महासचिव महाराष्ट्र हे या राष्ट्रीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरासाठी राजगीर, बिहार येथे सहभागी होणार आहेत.या प्रशिक्षणातून मिळणारे मार्गदर्शन महाराष्ट्रात पक्ष संघटना अधिक व्यापक व मजबूत करण्यासाठी उपयोगी ठरणार असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात राष्ट्रीय लोक मोर्चाची संघटनात्मक तयारी अधिक वेगाने करण्याचा निर्धार यावेळी करण्यात येणार आहे. बाबासाहेब पठारे, खय्युम खान राजगिर बिहार ला कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराला जात आहेत म्हणून त्यांचे बाळकृष्ण भावठाणकर, प्रतीक एकबोटे, माधव ढवळे, बाळासाहेब भोसले, आबासाहेब जेजुरकर, विलास वाघमारे, दयानंद गायकवाड, निलेश भालेराव, किरण पवार, इत्यादीनी अभिनंदन केले आहे.

## बिल्डा येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



**बिल्डा :** 80 वा भारतीय स्वातंत्र्यदिन आज भारतरत्न राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला....मेहेर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, भारतरत्न राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय बिल्डा ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर येथे आज दिनांक 15/08/2026 रोज शनिवार ठिक सकाळी 7:40 वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात इमारतीवर ध्वजारोहण कार्यक्रम श्री.ज्ञानेश्वर पाटील मते ( मा.संचालक देवगिरी सहकारी साखर कारखाना फुलंब्री तथा मा.सरपंच बिल्डा यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण पार पडले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री.कैलास बोलकर ( सोसायटी संचालक सदस्य बिल्डा) तसेच श्री. कैलासराव पाटील चव्हाण ( सोसायटी संचालक सदस्य बिल्डा) तसेच गावातील जेष्ठ प्रतिष्ठीत नागरीक श्री.सोमिनाथ पाटील मते संरपच बिल्डा, श्री.सुदाम भाऊ मते माजी सरपंच, श्री.सुरेशराव मुळे माजी उपसरपंच श्री.नाना बोरसे शालेय शिक्षण समिती अध्यक्ष जिल्हा प्राथमिक शाळा बिल्डा, श्री.आकाश गायकवाड श्रीमती निर्मला श्रीरसागर मॅडम ( मुख्याध्यापिका जि.प.शाळा बिल्डा ) श्री. निलमा निंलगे मॅडम सहशिक्षका बिल्डा जि.प.शाळा बिल्डा श्री. विलास आण्णा जाधव चेअरमन सोसायटी बिल्डा प्राचार्य संतोष पुंडगे सर .... इतयादी उपसथित होते


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशनसचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.टी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ ऑगस्ट २०२६


## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्था संचालक अरुणजी अग्रवाल यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रारंभी वंदे मातरम, त्यानंतर राष्ट्रगीत नंतर राज्यगीत गायन करण्यात आले. जालना नायक वृत्तपत्राद्वारे घेण्यात आलेल्या गायन स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाल्याबद्दल सत्यप्रिय शृंगारे हिचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी श्री.अरुण अग्रवाल, संजय देशमुख, डॉ. कविता प्राशर राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले.

## स्वातंत्र्यदिनानिमित्त डॉ. सागर पतंगे यांच्या हस्ते ध्वजारोहण



**गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) :** येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात आज ८० व्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित ध्वजारोहण समारंभात उमरगा येथील वैद्यकीय क्षेत्रातील नामांकित आणि श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. सागर पतंगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव डॉ. दामोदर काका पतंगे , संस्थेचे उपाध्यक्ष मा. प्रभाकर तात्या हिरवे, संघायजी स्वामी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड ,संस्थेच्या सर्व शाखांचे प्रमुख, गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. स्वातंत्र्याच्या या प्रदीर्घ प्रवासात आज आपण विविध क्षेत्रात अत्यंत दैदिप्यमान कामगिरी केली आहे, अनेक क्षेत्रात राष्ट्र म्हणून नावलौकिक मिळवला आहे पण या स्वातंत्र्य मिळवण्यापाठीमागे अनेक ज्ञात अज्ञात लोकांनी आपल्या प्राणांची आहुती दिलेली आहे. राष्ट्रीय पातळीवरील अनेक राजकीय आणि अराजकीय समाजसुधारक व स्वातंत्र्यसेनानी यांनी आपल्या घराची राखरांगोळी करून आपले बलिदान दिले त्यामुळेच स्वातंत्र्याची ही मधुर फळे आपण चाखत आहोत याक्षणी त्यांची आवर्जून आठवण होते आणि ती केलीच पाहिजे असे सांगून प्रा. डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक करत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. दिनांक १३/१४/१५ असे तीन दिवस श्रीकृष्ण महाविद्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. स्वातंत्र्याचा हा महोत्सव साजरा करताना गुरुवार दिनांक १४/०८/२०२६ रोजी सकाळी १०:१५ वाजता संस्थेचे सन्माननीय संघायजी स्वामी यांच्या हस्ते पहिले झेंडावंदन करण्यात आले. दुसऱ्या दिवशी श्रीकृष्ण संस्थेचे उपाध्यक्ष मा. प्रभाकर तात्या हिरवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याच दिवशी महाविद्यालयाच्या परिसरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. त्याचे नेतृत्व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.भाऊसाहेब उगले व समन्वयक प्रा डॉ.बालाजी कोनाळे यांनी केले.यावेळी प्रा. डॉ. किसान लोहार, प्रा. डॉ. योगीराज विजापुरे, प्रा. डॉ. विलास होगाडे, प्रा.डॉ. दस्तगीर पठाण, प्रा.डॉ. आशिया चिशती, प्रा डॉ. मेघा जोशी, प्रा. हणमंत देशमुख, प्रा. डॉ. विनोद धनेराव, प्रा. डॉ. दिगंबर चव्हाण,राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला प्रतिनिधी प्रा. डॉ. मल्लमा आंबुसे, प्रा. डॉ. राम कदम, प्रा. डॉ. एस. एम. पतंगे, प्रा. आय. एस. इनामदार, डॉ. अनिल काळदाते, प्रा. डॉ.महादेव खोत, प्रा. सूर्यकांत कोडे, प्रा. डॉ.पंकज पाताळे, प्रा.शंकर चव्हाण , प्रा. प्रसाद बेळमकर, प्रा. अंकिता जाधव , प्रा.राजेंद्र पात्रे, प्रा. तन्वीर पठाण , प्रा. अरविंद राठोड आणि प्राध्यापकेतर सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## आदरणीय अटल जी

आदरणीय अटलजी
तुम्ही सांभाळली नाही
फक्त सत्ता
तर सत्तेला
संस्कार दिला
माणूसपणाचा..

शब्दांच्या सागरातील
अनमोल मोती
शब्द तुमचा
कवी कुळाचा
वारसा घेऊन
घडलेला.. मढलेला..

भारत मातेच्या चरणावरील
सुगंधित फुलासारखा..

किती वादळं
आली अन् गेली
पराभवही आले वाट्याला
पण ढळला नाहीस तुम्ही
विचारांपासून
हार नहीं मानूँगा
या दृढ निश्चयाने..
नावातच 'अटल ' असल्याने..

तुम्ही लिहिला नाही
फक्त इतिहास
पोखरणच्या वाळवंटात
देशाच्या सामर्थ्याचा
तर लाहोरच्या वाटेला
दिला शांततेचा हात

अन् जोडले रस्ते
माणसासोबत मातृभूमीचे..
राजकारणाच्या गोंगाटातही
काळजातल्या कवीला
जिवंत ठेवून..

अन् काळाच्या पडद्यावर
अटल होऊन
लिहिला अटल इतिहास
अटल विचारांचा..उजेडाचा..
अन् नव भारताच्या
सामर्थ्याचा..

**ज्ञानेश्वर गायके**
**कन्नड**

## नागपंचमी

श्रावण घेऊन आला
सण नागपंचमीचा
हिरवाईने नटली सृष्टी
सोहळा आनंदाचा

पारंपारिक वेशभूषेत
वारूळाजवळ जमल्या बाया
नागोबाची पूजा करूनी
वाहे गूळ, फुटाणे, लाह्या

झोका बांधला झाडाला
हिरव्या हिरव्या रानी
उंच झोका घेतांना
आनंद मावेना मनी

सायंकाळच्या वेळी
सख्या जमल्या अंगणी
माहेरवाशिणी गाती
फेर धरुनी गाणी

करूया नागाचे जतन
नको त्याला सजा
नागपंचमीच्या सणाला
हीच खरी पूजा



**- कल्पना चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**

## सावध होऊन ऐका ऐका!

सावध होऊन ऐका ऐका!
सांगतो हिताची गोष्ट आता.
बंद करावे कायम बडबड,
बिनकामाच्या पोकळ बाता. १

बेफिकीर वृत्ती सदा सर्वदा,
जीवनात धोक्याचे असते.
उधळलेल्या बेभान मनाला,
धोका काही कळणार नसते. २

धोक्याच्या या वळणावर,
सदा तरुणांनी सतर्क रहावे.
मनास आपल्या आपणच,
सदा सर्वदा काबुत करावे. ३

कालचक्रात वेळ कुणासाठी,
कधीच क्षणभर थांबत नसते.
सतत अविरत कायम निरंतर,
कधी न थकता चालत असते.
४

सदा वेळेवर वेळे बरोबर,
जो कोणी शर्यतीत धावतो.
जीवनात तोच कायमचा,
विजयाचा पताका लावतो. ५

**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ ऑगस्ट २०२६


## व्यंकटेश पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** श्री तिरुपती शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर संचलित,श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल भारतमाता कॉलनी, बीडबायपास, छत्रपती संभाजीनगर.*या शाळेत स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी सकाळीच सर्व विद्यार्थी आपल्या युनिफॉर्म मध्ये तयार होऊन शाळेत आले आणि प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या लेझीम पथकाद्वारे परिसरातील सर्व पालकांना आकर्षित केले. तसेच प्रभातफेरी झाल्यानंतर शाळेत (हायकोर्ट बार असोसिएशनच्या मा.सदस्य) आदरणीय श्रीमती Adv.नसीमाबानु देशमुख मॅडम यांच्या हस्ते ध्वजारोहणात करण्यात आले. ध्वजारोहण झाल्यानंतर सर्वांनी वंदे मातरम्, राष्ट्रगीत आणि राज्यगीत गायन केले.श्री तिरुपती शिक्षण संस्थेचे सर्वेसर्वा आदरणीय बप्पासाहेब यांनी सर्व विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्यात.या प्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रमाचे अध्यक्षपदी (ओबीसी मोर्चा मा.शहर जिल्हा उपाध्यक्ष)भाजपा पदाधिकारी श्री आनंद आडे यांची उपस्थिती होती. तसेच भाजप पदाधिकारी श्री कैलासजी चव्हाण साहेब, Adv. सबनीस मॅडम, श्री देशमुख साहेब,श्री पंकज मोदी, जय हो फाउंडेशनचे अध्यक्षश्री देशमुख सर,श्री प्रशांत पवार सर, श्री संतोष भाऊ हिवाळे पाटील, समाजसेवक देवळाई छत्रपती संभाजीनगर. तसेच श्री शिंदे मामा, श्री अंकुश भालेकर साहेब, श्री गणेश कुमावत साहेब,क्रीडा शिक्षक श्री मुळे सर,श्री Adv. कदम साहेब, यांची प्रमुख उपस्थिती होती.सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेत सादर केली तसेच भाषण स्पर्धा सादर केली.आणि त्याचबरोबर विशेष देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर केले.याप्रसंगी श्री क्रीडा शिक्षक आदरणीय मुळे सर यांनी ज्या विद्यार्थ्यांनी नृत्य छान सादर केले, त्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे दिलेत.तसेच सर्व कार्यक्रम झाल्यानंतर परिसरातील नामांकित व्यक्तिमत्व श्री सावजी काका यांच्यातर्फे सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना बिस्किटे वाटप करण्यात आले. तसेच श्री पंकज मोदी साहेब, 'जय हो फाउंडेशनचे' अध्यक्ष श्री पंकजजी मोदी साहेब यांच्या मार्फत चॉकलेट वाटप करण्यात आले.आदरणीय देशमुख मॅडम यांच्यामार्फत केळी वाटप करण्यात आली. आणि तसेच भाजपा पदाधिकारी कैलास भाऊ चव्हाण यांच्या मार्फत सर्व विद्यार्थ्यांना मिठाई खाऊ देण्यात आला. तसेच सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आदरणीय श्रीमती पवार मॅडम, श्री ज्येष्ठ शिक्षक संभाजी भोसले सर, शिंदे सर, , खैरे सर , पडवाल सर, गायकवाड सर, मनगटे सर,जुमडे सर, धनवे सर, श्रीमती विजया दारुन्टे मॅडम, श्रीमती अनुराधा बोरुडे मॅडम, यांनी परिश्रम घेतले. सदर सदरील यशस्वी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री घुले सर यांनी केले, आणि त्याचबरोबर श्री राजू बारसे मामा, श्री एकनाथ बोडखे मामा आणि जाधव मावशी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** अजिंठा शिक्षण संस्था संचलित , पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अजिंठा शिक्षण संस्थेचे संचालक श्री शिवदीप रंगनाथ काळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांना उद्देशून त्यांनी आपल्या भाषणात संदेश दिला की, आज आपण स्वातंत्र्याचा आनंद घेतो, पण ही स्वातंत्र्यता टिकवणे आपली जबाबदारी आहे. आपण शिक्षण, स्वच्छता, शिस्त आणि देशप्रेम हे मूल्य अंगीकारले पाहिजे .आजच्या दिवशी आपण सर्वांनी आपल्या देशासाठी काहीतरी चांगले करण्याचा संकल्प केला पाहिजे. आणि हा संकल्प आचरणात आणला पाहिजे.ज्या स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्याला स्वातंत्र्य प्राप्त करून दिले. त्यांचेही स्मरण आपण करावयास हवे. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित नलावडे, प्राचार्य अन्वरसाब नरेगल, प्रभारी क्रीडा संचालक डॉ दिगंबर गंगावणे , राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ . लक्ष्मीनारायण कुरपटवार, डॉ. शिल्पा जिवरग, प्रा. गोविंद फड, डॉ. रिझवान खान श्री जय सोने, डॉ. दिलीप बिरूटे, डॉ. भास्कर टेकाळे, डॉ. भा ना गाडेकर, डॉ राजू वनारसे, डॉ प्रशांत देशमुख, डॉ. ज्योती आधाने, प्रा. प्रफुल देवरे डॉ.राजू तुपे , डॉ श्रीकांत जाधव, प्रा. रामहरी सोंडगे उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले। प्रांगणात विधार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुशीलादेवी देशमुख विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** येथील सुशीलादेवी देशमुख विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे सचिव श्री. चेतन माने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी नगरसेविका श्रीमती वैशाली कोरडे , श्री. रामेश्वर कोरडे व संस्थेचे अध्यक्ष श्री. निखिल माने यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. तसेच मुख्याध्यापक श्री. बी. जे. पहिलवान, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती उर्मिला थेटे, श्री. प्रल्हाद बनसोडे तसेच पालक शिक्षक संघाचे पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी संगीत पी. टी., देशभक्तीपर गीते, समुहनृत्य, भाषणे इत्यादी भरगच्च कार्यक्रम सादर केले. तसेच इयत्ता १०वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि आंतरशालेय स्पर्धेत बक्षीस प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. रमाकांत छडीदार यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती प्रियंका तुगावे यांनी केले. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे सर्व विद्यार्थी , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ ऑगस्ट २०२६


# कालिकादेवी विद्यालयात प्राचार्य केशव भांगे यांच्या हस्ते ध्वजारोहण



**(शिरूर कासार) :** आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित,कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात,'१५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते 'राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर' यांच्या प्रतिमेचे पूजन करून,राष्ट्रीय ध्वजाला सलामी देऊन सामूहिक राष्ट्रगीत घेण्यात आले.त्यानंतर 'वंदे मातरम' व राज्यगीत सामूहिकपणे घेण्यात आले.याप्रसंगी प्राचार्य केशव भांगे साहेबांनी अध्यक्ष भाषणात भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास सांगताना म्हणाले की, ब्रिटिशांनी भारतीयांना दीडशे वर्षे अज्ञानात ठेवून आपल्यावर गुलामी लादली होती.आपल्या देशातलं सारं वैभव लुटून नेलं.हे आपल्या भारतीयांना फार उशिरा लक्षात आलं.पुढे भारतीयांना स्वतंत्र्याचा संग्राम उभा करावा लागला.त्यासाठी अनेकांना प्राणांचे बलिदान द्यावे लागले.आपल्या मायभूमीसाठी रक्त सांडावे लागले.त्यांच्या या बलिदानातूनच स्वातंत्र्याचा सूर्य उगवला आहे.तेव्हा स्वतंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या या सर्व स्वातंत्र्यवीरांचा ऐतिहासिक पराक्रम आम्ही कधीच विसरू शकत नाही.असे त्यांनी यावेळी सांगितले.या प्रसंगी शिरूर (का.) नगरीचे नगराध्यक्ष मा.रोहिदास पाटील गाडेकर, नगरसेवक वसंतराव काटे,अर्जुन काका गाडेकर, संचालक शरद (अण्णा) ढाकणे, मा.गोविंदराव पाटील गाडेकर,मा.बबनराव (तात्या) ढाकणे,माजी नगराध्यक्ष दत्ता पाटील गाडेकर, बांधकाम सभापती अक्षय रणखांब, प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे, नगरसेवक दादासाहेब हरिदास, संतोष भांडेकर, शेख फैयाज भाई, राधाकिसन शेळके, रमाकांत अंदुरे गुरुजी, बाजीराव सानप, युवराज सोनवणे, ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार गाडेकर पाटील, गोकुळजी पवार, बबनराव देशमुख, मनोज परदेशी, प्रतीक भांडेकर,राज कातकडे, युवा नेते सागर केदार, तसेच शिरूर (का.)येथील आजी-माजी जि.प.सदस्य, पं.स.सदस्य, नगरसेवक, अधिकारी-पदाधिकारी,व्यापारी,डॉक्टर, वकील, सामाजिक कार्यकर्ते,ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नेते-कार्यकर्ते,युवक-कार्यकर्ते, प्राचार्य, उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रानभाजी महोत्सवाचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन



**बीड (भगवंत पाळवदे) :** जिल्ह्यात रानभाज्यांचे महत्त्व आणि त्यांचे औषधी गुणधर्म लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या रानभाजी महोत्सव 2026 चे उद्घाटन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. रानभाजी महोत्सव 2026 चे आयोजन भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन परिसरात करण्यात आले आहे. याच्या उदघाटनप्रसंगी आमदार विजयसिंह पंडित, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, तसेच जिल्हा कृषी अधिकारी सुभाष साळवे यांच्यासह कृषी व संबंधित यंत्रणेचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी महोत्सवात लावण्यात आलेल्या विविध स्टॉल्सना भेट दिली. त्यांनी मराठवाड्यात प्रामुख्याने आढळणाऱ्या दुर्मिळ आणि पौष्टिक रानभाज्यांचे अत्यंत बारकाईने निरीक्षण केले. यावेळी जुन्या आठवणींना उजाळा देत, मी मराठवाड्यात असताना यातील अनेक रानभाज्या आवडीने खाल्ल्या आहेत, अशी भावनिक आठवण त्यांनी बोलून दाखविली.पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी महोत्सवात प्रदर्शित केलेल्या प्रत्येक रानभाजीचे औषधी उपयोग, जीवनसत्त्वे आणि आरोग्यासाठी असणारे गुणधर्म जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांच्याकडून सविस्तरपणे जाणून घेतले. रासायनिक खतांपासून दूर असलेल्या आणि नैसर्गिकरित्या उगवणाऱ्या या भाज्या नागरिकांच्या आरोग्यासाठी कशा फायदेशीर आहेत, यावर त्यांनी चर्चा केली. रानभाजी महोत्सवाच्या माध्यमातून जिल्ह्यातील नागरिकांना आणि तरुण पिढीला निसर्गाच्या या अनमोल ठेव्याची माहिती मिळण्यास मोठी मदत होणार आहे. रानभाजी महोत्सवाला बीडमधील नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी प्रतिसाद द्यावा, असे आवाहनही पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी केले

# ठाकरवाडी जिल्हा परिषद शाळेत देशभक्तीच्या उत्साहात स्वातंत्र्य दिन साजरा



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी या शाळेचे केंद्रप्रमुख श्री हारदे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव; ५,००० रुपये बक्षीस व डॉ. सुशीलकुमार दुधारे यांच्या सहकार्याने निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे वाटप करण्यात आले."ज्ञान, संस्कार आणि शिस्त यासाठी आमची कटिबद्धता" या ध्येयवाक्याला साजेसे वातावरण निर्माण करत जि. प. प्रा. शा. ठाकरवाडी, केंद्र—गल्लेबोरगाव, ता. खुलताबाद, जि. छ. संभाजीनगर येथे देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात, जल्लोषात आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या प्रभात फेरीने झाली. हातात तिरंगा आणि ओठांवर देशभक्तीच्या घोषणा घेत विद्यार्थ्यांनी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. त्यानंतर श्री रामचंद्र मधे यांच्या उपस्थितीत प्रतिमा पूजन व राष्ट्रध्वज पूजन करण्यात आले. 'वंदे मातरम्' आणि राष्ट्रगीताच्या सामूहिक गायनाने संपूर्ण परिसर देशभक्तीने भारावून गेला.यानंतर मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. शाळेतील पाच विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व, स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान, देशाप्रती आपली जबाबदारी आणि राष्ट्रनिर्मितीतील विद्यार्थ्यांची भूमिका प्रभावीपणे मांडली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीतांनी उपस्थितांची मने जिंकली.गुणवंत विद्यार्थ्यांना ₹५,००० चे प्रोत्साहनपर बक्षीसकार्यक्रमातील विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे केंद्रप्रमुख आदरणीय श्री. हरदे साहेब यांनी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला प्रेरणा मिळावी या उद्देशाने ₹५,०००/- चे बक्षीस दिले. त्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.यावेळी आदरणीय श्री हारदे सर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण, शिस्त, संस्कार, सातत्यपूर्ण मेहनत आणि जीवनात मोठे ध्येय ठेवण्याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. "आजचा विद्यार्थी हा उद्याच्या भारताचा शिल्पकार आहे," या भावनेतून त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्याची प्रेरणा दिली.निबंध स्पर्धेतून विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे वाटपविद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्जनशील विकासाला चालना देण्यासाठी डॉ. सुशीलकुमार भास्कर दुधारे यांच्या सहकार्याने शाळेत निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या कल्पकतेला आणि लेखनकौशल्याला वाव दिला. स्पर्धेत सहभागी व गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे वाटप करण्यात आले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचन, लेखन, सर्जनशीलता, स्पर्धात्मक वृत्ती आणि आत्मविश्वास वाढण्यास निश्चितच मदत होणार असल्याचे उपस्थितांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अशा प्रकारचे सहकार्य करणाऱ्या डॉ. सुशीलकुमार भास्कर दुधारे यांचे शाळेच्या वतीने विशेष आभार मानण्यात आले.कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या मनोगतांनंतर देशभक्तीपर गीत सादरीकरण, मान्यवर मनोगत, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण अशा विविध उपक्रमांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. शेवटी शाळेच्या प्रगतीसाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवर, पालक, ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी नागरिक व हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक श्री. गालफाडे सर, सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, शाळा व्यवस्थापन समिती, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ यांनी विशेष परिश्रम घेतले.विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन, सर्जनशीलतेला संधी आणि देशभक्तीला संस्कारांची जोड देणारा हा स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम ठाकरवाडी शाळेसाठी निश्चितच अविस्मरणीय ठरला."विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य, त्यांच्या यशाची उमेद आणि देशासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा— व्यक्त केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ ऑगस्ट २०२६


## जीवन विकास ग्रंथालयातर्फे ८०वा स्वातंत्र्यदिन संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** टिळकनगर येथील जीवन विकास ग्रंथालयाचे नियमित वाचक व हितचिंतक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे निवृत्त सेक्शनल अभियंता मंगलसिंग पाकळ (राजपूत) यांच्या हस्ते ग्रंथालयाच्या आवारात ध्वजारोहण करुन स्वातंत्र्यदिन सोहळा संपन्न झाला. ध्वजारोहण प्रसंगी “वसाहतीच्या नावात टिळक, शेजारी व्यंकटरमण बालाजी मंदिर आणि सुरवातीस जीवन विकास ग्रंथालय अशा भाग्यशाली परिसरात राहायला मिळते आहे यासाठी आम्ही स्वत:ला भाग्यशाली समजतो.” असे उद्गार मंगलसिंग पाकळ यांनी काढले. पुढे बोलताना ते म्हणाले की ग्रंथ वाचनातून जीवन विकास होत आहे. हे ग्रंथालय विविध पुरस्कार देऊन व वाचन विषयक कार्य करुन डिजिटल ओढ वाढत असतांना वाचनाची आवड जोपासत आहे, याची जाणीव आहे. हे बोलताना त्यांनी “जो कोणी धरेल ज्ञानाची कास, त्याने येथे यावे धरुन आस, या ग्रंथालयात त्यांनी वाचावे ग्रंथ खास, त्यांच्या ज्ञानात भर पडेल हमखास” या पंक्ती उधृत करुन ग्रंथालयाला रु.११११११/- देणगी दिली. अंतत: भारतीय स्वातंत्र्याची मूल्ये जोपासली जावी यासंदर्भात ते म्हणाले “हजारोंच्या प्रयत्नाने मिळाले हे स्वातंत्र्य महान, राखू या सदैव आपण देशाचा अभिमान, रक्ताचे पाणी करून ज्यांनी हा देश तारला, त्यांचा हा सोहळा आज आपण साजरा केला,” ज्येष्ठ कार्यकारिणी सदस्य प्राचार्य जीवन देसाई यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने काल राज्य ग्रंथालय परिषदेवर नामनिर्देशनाने नियुक्त केलेल्या गुलाबराव मगर यांचा सत्कार कार्यकारिणी सदस्य महेश बावस्कर यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी सामुदायिक राष्ट्रगीत, राष्ट्रगान झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजशेखर बालेकर यांनी आणि आभार महेश बावस्कर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी अशोक लाटे, माधवराव कुलकर्णी, माधव देशपांडे, प्रदीप मंडलिक, सातारकर, श्री व सौ. चिमणपूरे, नितीन काजवे, सौ. प्रिती अंकुशे, लक्ष्मण मोरे, कांतीलाल जाधव आणि परिसरातील वाचक नागरिक व अभ्यासिकेतील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## "समृद्ध शेतकरी, सुदृढ जनावर आणि स्वावलंबी मराठवाडा" घडवण्याचा संकल्प



**बीड (भगवंत पाळवदे) :** परळी वैजनाथ येथे ६३४ कोटी रुपये खर्चाच्या पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाचा कोनशीला समारंभ आणि भूमिपूजन सोहळा राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या शुभ हस्ते उत्साहात संपन्न झाला. या प्रकल्पामुळे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे पशुवैद्यकीय शिक्षण मिळण्यासोबतच स्थानिक शेतकऱ्यांच्या समृद्धीला नवीन दिशा मिळणार आहे.पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे, आ. नमिता मुंदडा, माजी खासदार डॉ. प्रीतम मुंडे, संजय दौंड, बदामराव पंडीत, पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, नगराध्यक्षा परळी - वैजनाथ, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन्. रामास्वामी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनीत कावत, अजय मुंडे, अक्षय मुंदडा, आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.आपल्या भाषणात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, महाराष्ट्र हा कष्टकऱ्यांचा आणि मराठवाडा ही कष्टाची खाण आहे. शेतीला मुख्य आधार देणाऱ्या पशुधनाची काळजी घेणे ही काळाची गरज बनली आहे. ह्या क्षेत्रात उच्च शिक्षणासाठी मराठवाड्यातील मुले- मुलींसाठी हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे नवे महाविद्यालय उपलब्ध होणार आहे. , यामहाविद्यालयामुळे अत्याधुनिक शिक्षण आणि सुविधा उपलब्ध होतील. ज्याचा लगतच्या जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांनाही लाभ होणार आहे.६३४ कोटी रुपयांची भरघोस तरतूद, सुसज्ज इमारत, वसतिगृह (हॉस्टेल), अत्याधुनिक प्रयोगशाळा आणि संशोधन केंद्र. आजूबाजूच्या ५० ते १०० गावांतील जनावरांवर आधुनिक उपचार परळीतच होणार. दूध उत्पादन वाढवणे आणि फायदेशीर शेळीपालनावर संशोधन केले जाईल.या महाविद्यालयातून केवळ नोकरी मागणारे डॉक्टर नव्हे, तर पेट केअर क्लिनीक, डेअरी सल्लागार आणि पशुखाद्य निर्मिती क्षेत्रात नोकरी देणारे तरुण उद्योजक तयार व्हावेत, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी यावेळी आपल्या भाषणात व्यक्त केली. तसेच चालू शैक्षणिक वर्षातच येथील प्रवेश सुरू केले जातील असेही त्या म्हणाल्या.या महाविद्यालयाचे काम अत्यंत दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश यंत्रणेला देण्यात आले असून तसेच "समृद्ध शेतकरी, सुदृढ जनावर आणि स्वावलंबी मराठवाडा" घडवण्याचा संकल्प करण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी यावेळी सांगितले.यावेळी बोलताना आमदार धनंजय मुंडे म्हणाले की परळी येथे पशुवैद्यक महाविद्यालय याच्यासोबत कृषी महाविद्यालय ते देखील आंतरराष्ट्रीय दर्जाचे होत आहे याचा आनंद आहे. बारामती येथील कृषी प्रदर्शनात अजितदादांनी याची घोषणा केली होती त्यामुळे बारामती येथील पशुवैद्यक महाविद्यालयाला स्व. अजितदादा यांचे व परळी येथील पशुवैद्यक महाविद्यालयाला स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे नाव द्यावे असेही श्री धनंजय मुंडे म्हणालेया पशुवैद्यक महाविद्यालयाच्या माध्यमातून परळी परिसरात मोठ्या प्रमाणावर बदल होणार आहेत असे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या. पशुपालकांना त्यांच्या व्यवसायाच्या मदतीसाठी 50 टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. पशुसंवर्धन खात्याची मंत्री या नात्याने या महाविद्यालयास स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे नाव घेण्याची ग्वाही मी देते असेही पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या


MAHARASHTRA JANSHAKTI NEWS.COM
MAHARASHTRA JANSHAKTI
MJ NEWS






महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ ऑगस्ट २०२६

# प्रतिबिंब आणि पडसाद - पाय आणि वाटा समीक्षा




ख्यातनाम कवी कथाकार कादंबरीकार समीक्षक डॉ युवराज मेघराज पवार यांनी संपादन केलेला प्रतिबिंब आणि पडसाद सचिन पाटील यांच्या 'पाय आणि वाटा' या ललितलेख संग्रहाचा हा समीक्षाग्रंथ म्हणजे एक सृजनशील समीक्षेची साक्षेपी दृष्टी देणारा ग्रंथ आहे.यातसाहित्य समीक्षेचा मागोवा घेतं साहित्यकला कृतीकडे आस्वादक ते प्रखर मतवादी समीक्षक लेखकांची सृजन समर्पक दिशा देतो.ही मनोभूमिकेतून डॉ युवराज पवार यांनी हे मनस्वी संपादन केले आहे ते लिहितात "या ग्रंथातील समीक्षा केवळ साहित्यकृतीचा ऊहापोह करत नाहीत,तर त्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवी मूल्यांचे सूक्ष्म प्रतिबिंबही उलगडतात.लेखकांची शैली, आशय आणि अभिव्यक्तीतील वैशिष्ट्यांचा सखोल अभ्यास येथे वाचायला मिळतो.साहित्याच्या व्यापक संदर्भाची आणि बदलत्या प्रवाहाची जाणीव अधिक तीव्रतेने होते.'पाय आणि वाटा:-प्रतिबिंब आणि पडसाद'हा केवळ समीक्षाग्रंथ नसून,तो वाचकाला विचार प्रवृत्त करणारा, साहित्याच्या वाटेवर नवे दृष्टीकोन देणारा आणि संवेदनशीलतेचा ठसा उमटवणारा प्रवास आहे.साहित्यप्रेमी,अभ्यासक आणि संशोधकांसाठी हा ग्रंथ नक्कीच मार्गदर्शक ठरेल.यात शंका नाही"(ब्लर्ब)ही पाठराखण एक सृजनशील अभ्यासक दमदार अभिव्यक्तीची बोलीभाषेची प्रादेशिकतेची चिंतन आशय संपन्नता ठेवून जाते.पाय आणि वाटा प्रकाशन भाष्य म्हणून साहित्य अकादमी पुरस्कारविजेते कृष्णात खोत यांची नितळ निर्लेप निस्पृह श्रद्धेय मनाने आजच्या वर्तमानाची साहित्य चिंता मांडतात.हे वास्तव असे या समीक्षाग्रंथात आहे "अलीकडे माहिती सांगणे म्हणजे साहित्य असा एक प्रकार जो आला आहे तो अतिशय वाईट आहे.माहिती म्हणजे साहित्य.की मला हे हे माहीत आहे, म्हणून मी लिहिलं.पुढे आज एका माणसाचा समाज तयार केलाय आपण!समाजाची व्याख्या बदलली आहे.'नव मॅन कम्युनिटी 'आज एका माणसाचा समाज करणे इतपत आपण गेलो आहे.लोकशाही मूल्ये हे संविधानात असून चालणार नाही तर ती माणसात वर्धित झाली पाहिजे,तरच त्याच्या कुटुंबात वर्धित होईल.म्हणून इथून पुढे साहित्यामध्ये माणूस केंद्रबिंदू असणार नाही तर जो संवेदनशील लेखक असेल,कवी कलावंत कथाकार कादंबरीकार नाटककार असेल जो गंभीरपणे साहित्याचा विचार करतो म्हणून आपल्या जगण्याचा आणि मूल्यवस्थेचा प्रश्न आहे.आपली मूल्यव्यवस्था हरवत निघाली असताना असा कुणीतरी सचिन पाटलांसारखा ही मूल्यं आपल्या ललितलेखनातून मांडतो ही बाब महत्त्वाची आहे "(पृ१२५)ही अनुभवसिद्ध चिंतन चिकित्सा आजच्या समकालीन वास्तवाची प्रेरणादायी ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.तर जेष्ठ साहित्यिक नामदेव माळी यांनी "पाय आणि वाटा'च्या लेखनामध्ये भाषेच्या अंगाने, शैलीच्या अंगाने, संवेदनशीलता, विचार, भावभावना तिव्रतेने येतात.सचिनने हे वेगवेगळ्या पध्दतीने आतमध्ये मुरवले आहे.आलीकडे ललित हा साहित्य प्रकार फारसा कुणी हाताळत नाहीत.त्यामुळं वेगळं आणि अस्सल असं हे लेखन आहे "(पृ.१२०)या जेष्ठांचा साहित्यानुबंध या समीक्षाग्रंथाला लाभला आहे.सचिन पाटील कृतज्ञतेच्या ओलाव्यातून लिहितात "ज्यांच्या शब्दांनी विचारांना दिशा दिली, आणि भावनांना अर्थ मिळवून दिला त्या प्रेरणास्थानाला हा समीक्षाग्रंथ सादर"..हा सविनय जिव्हाळा कायमच आहे.प्रस्तुत समीक्षण परिक्षण परिचय प्रतिक्रिया एकूण बावीस आहेत.'संवेदनशील मनाच्या समृद्ध जगण्याचे तत्वज्ञान' डॉ चंद्रकांत पोतदार यांनी अतिशय आशय संपन्न सृजन समर्पक विवेचन केले आहे.ललित लेखनशैलीचे अनुभूती मांडली आहे.तर कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके यांनी 'अदम्य इच्छाशक्तीचा सृजनशील ललितबंध' या ललित लेखनाची नाविन्यपूर्णता, जगण्याचे संदर्भ, गाव शिवारातील मायमातीचा गंध व ललितलेखनाचे वैशिष्ट्ये यात आहे. डॉ.विठ्ठल रोटे यांनी आत्मवृत्तपर ललितलेखन यात या ललितलेखकाच्या जीवन जाणिव मांडल्या आहेत.मनीषा पाटील यांनी 'वेदनेची गाथा'असे संबोधून खरोखरच यथोचित समीक्षण विश्लेषण केले आहे.राहुल गोखले 'याच्या 'आठवणींच्या भावुक पायवाटा'या लेखात तत्कालीन स्मृतींचा भावकल्लोळ व मनाची भावूक्ता व्यक्त केली आहे.मंदाकिनी सपकाळ यांच्या 'पुर्वायुष्याच्या आठवणीचा कोष म्हणजे पाय आणि वाटा'च्या सहृदय आठवणी जिवंत केल्या आहेत.तर 'आठवणीचा जादूई पेटारा' असे डॉ तुकाराम पाटील म्हणतात.कारण हे सारे ललितलेखन वाचताना काळी काळाच्या गोड गुपितांचा हा पेटारा आहे.साहित्य अभ्यासक चिंतन चिकित्सक प्रा साईनाथ पाचारणे यांनी या ललितलेखनाचे 'रुप,तंत्र, आणि घटीत आठवणींच्या त्रिमितीतून हे साकारलेले ललित गद्य आहे.अतिशय प्रेरणा प्रेरक बांधिलकी देऊन जाणारा हा लेखन आरसा ठरावा असा लेख.उज्वला केळकर यांनी 'हृदयस्थ आठवणी'मनात कायमचं झुलवा देत राहतात कारण हे गावाशिवारचे देखणेपण व हा शिवारमाथ्याचा भूलवा म्हणजे हे लेखन आहे. डॉ श्रीकांत पाटील या ललितलेखनात आठवणीचा तळ ढवळून काढणारी सल मनाला दु:ख देऊन जाते हा मायमातीशी असलेली नाळ जुळलेली आहेच ही हळूवार वेदना मुखर करणारा हा लेख.प्रा.सुरेंद्र पाटील यांच्या सृजनशील भावनेचा ओलावा देऊन त्यांनी 'संवेदनशील आठवांचे ठसे' म्हणजे ही हळवी काटेरी वेदनेची पाय वाट ठसे देऊन जाते. डॉ भारत बंडगर यांनी सामाजिक जाणीव अतिशय चिंतन आशय संपन्नतेने मांडले आहे.विजया हिरमेठ यांनी लेखक संचित आणि सचिन याचा संघर्ष म्हणजे जगण्याच्या अनेक वाटा.'पाय नसणाऱ्या माणसाचं दु:ख'तो इवळून कळवळून सांगेल पण सचिन पाटील दु:ख अक्षरमय करून त्या दु:खात लालित्य शोधून लेखन करतात.सौ.अलका ओमप्रकाश माळी यानी विचाराने हालेख समृद्ध केला.एस.एस.जाधव यांच्या 'दु:खाच्या वाटांवर उमटलेले लालित्य शोधून हे लेखन केले आहे.'संवेदनशील मनाने अनुभवलेल्या वाटा'कल्लाप्पा ज्योतीबा पाटील यांनी अनुभवाची शिदोरी कशी वाटता येते पण त्यात दु:ख ढगांचा लवलेश नाही असे हे ललितलेखन.प्राचार्य भास्कर गायकवाड 'अनुभवाचा मागोवा' हा भोगवटा तरलं करून महानुभवही अनुभवसिद्ध चिंतन या ललितलेखनाचे आहे.'अनोख्या मनोधैर्याची वाट दाखविणारे' बाळासाहेब कांबळे यांनी अतिशय मर्मग्राही आस्वादक भूमिकेची ही वहिवाट मनाचे श्लोक गात निघाली आहे असे मनोधैर्य वाढविणारे ललितलेखन आहे.'आनंद टकले यांच्या मनोज्ञ भूमिकेतून 'पाय आणि वाटा हा वास्तवाचा भोवताल'आहे असे म्हटले 'स्वकेंद्रीत, मुक्तचिंतनात्मक लेखन'विद्या बनाफर लेखक सचिन पाटील वास्तवातचं स्वकेंद्रित व मुक्तचिंतनी आहे.आपल्या गाव शिवारातील ही पाय वाटा त्यांना नेहमी सृजनतेची शिदोरी देतं आली आहे.अरुण वि.देशपांडे आजच्या समकालीन वास्तवाचे भान देऊन जातात आज या ललितलेखनाने गावाची पुन्हा नव्याने वाट दाखवली आहे.हेलपाटा काय तानाजी धरणे यांच्या'आठवणीच्या हिंदोळ्यावर उभ्या आयुष्यात येणाऱ्या अडचणींना रौंदत जाणारा'असा या लेखात तत्कालीन स्मृतींचा अनुभव अनुबंध रौंदळत खुंदळतं मनमुक्त रानवाटाचे आयुष्य वेचणारे सचिन पाटील यांची ही समीक्षा अतिशय टोकदार तर झालीच आहे.संशोधक अभ्यासक डॉ युवराज पवार यांची प्रत्येक परिक्षण समीक्षण यावरचे विश्लेषण व समीक्षेच्या परिप्रेक्ष्यात डोळसपणे प्रखर अभ्यासपूर्ण भाष्य केले आहे.या समीक्षाग्रंथाची प्रस्तावना म्हणजे कोणत्याही साहित्य प्रकाराकडे पाहताना एक लक्षवेधी भूमिका असली पाहिजे.लेखकाच्या चुका दाखवून देत त्याला नवसंजीवनी देत प्रेरणाही दिली पाहिजे असे चिंतन चिकित्सक अभ्यासक विवेचन समीक्षण या समीक्षा ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे.सचिन पाटील यांचे मनोगत असे"जीवनात काही वाईट घडलं तर जीवन संपत नाही! संघर्षातून आपण उभारी घेऊ शकतो.अभ्यासकांचे, समीक्षकांचे यावर भरभरून लेखी अभिप्राय आले.निवड अशा आशयाचे समीक्षण संपादन मराठीचे अभ्यासक प्रा. डॉ युवराज पवार धूळे यांनी अतिशय चोखंदळपणे केले आहे.पुनरावृती टाळून बरेच सर्जन कामही केले आहे.त्यामुळे 'पाय आणि वाटा:-प्रतिबिंब आणि पडसाद'या पुस्तकास मुल्यात्मक दर्जा प्राप्त झाला आहे "(पृ.४)ही कृतज्ञता आहे. डॉ.युवराज पवार यांनी समीक्षा ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रदिर्घ प्रस्तावना ते लिहितात "समीक्षाग्रंथ लेखकांसाठी प्रेरणादायी ठरतात.सकारात्मक समीक्षा लेखकाला अधिक चांगले लेखन करण्यास प्रोत्साहित करते,तर चिकित्सक समीक्षा त्याला स्वत:तील कमतरता ओळखण्यास मदत करते.त्यामुळे साहित्यविश्व वात सतत नवसर्जनाची प्रकिया सुरू होते.अखेर असे म्हणता येईल की पुस्तक समीक्षा आणि ग्रंथ हे साहित्याचे अविभाज्य घटक आहेत.ते वाचकाला केवळ आनंद देत नाहीत तर त्याला अर्थ आणि दिशा देतात.समाजाच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक प्रगतीसाठी हे घटक अत्यंत आवश्यक आहेत.वाचक, लेखक आणि समीक्षक यांच्यातील परस्पर संबंधांमुळे साहित्य अधिक समृद्ध होते.आणि समाज अधिक जागरूक बनतो."(पृ.२१)ही यातील चिंतन आशय संपन्नता इथे लाभली आहे.प्रत्येक अभ्यासकांनी, साहित्यिकांनी वाचकानी हा समीक्षाग्रंथ वाचलाच पाहिजे.या समीक्षा ग्रंथाचे मुख्यपृष्ठ अतिशय कल्पक बुद्धीची साक्षेपी आशय संपन्नता देऊन जाते. डॉ युवराज पवार सर मनस्वी हार्दिक शुभेच्छा.व अभिनंदन.



**पुस्तक:-प्रतिबिंब आणि पडसाद(संपादन समीक्षाग्रंथ)लेखक:- डॉ युवराज पवार,शिरपूर धुळे प्रकाशन:-आनंद प्रकाशन पुणे मुखपृष्ठ:-कोंदन प्रिंटसेट, सांगली पहिली आवृत्ती:-१० जुलै २०२६मूल्य:- २५० रूपये पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके जालना संवाद:- ९९७५१३७३३७**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ ऑगस्ट २०२६

# झोके राहिले... पण झुलणारे बालपण हरवले!

मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे ग्रामीण भागातील सण-उत्सवांची सामूहिकता, पारंपरिक खेळ आणि माणसांमधील संवाद हरवत चालल्याची खंतपूर्वी सण-उत्सव म्हटला की गावाच्या वातावरणात एक वेगळेच चैतन्य निर्माण व्हायचे. सणाची चाहूल लागण्याआधीच घरांची साफसफाई, अंगणातील सडा-रांगोळी, घराघरांतून येणारा गोड पदार्थांचा सुगंध आणि नातेवाईकांच्या भेटीगाठी सुरू व्हायच्या. सण हा केवळ एका कुटुंबाचा नसायचा; तो संपूर्ण गावाचा असायचा. प्रत्येक घरात आनंद आणि प्रत्येक चेहऱ्यावर उत्साह दिसायचा. आज मात्र मोबाईलच्या पडद्याने आणि बदलत्या जीवनशैलीने या सामूहिक आनंदाची जागा घेतल्याचे चित्र दिसत आहे.नागपंचमीचे झोके कुठे गेले?नागपंचमी येण्याच्या महिनाभर आधीच गावातील मोठमोठ्या झाडांवर झोके बांधले जायचे. झाडाच्या फांदीला मजबूत दोरी बांधून त्यावर लाकडी फळी बसवली जायची. सकाळपासून संध्याकाळपर्यंत मुली, महिला आणि लहान मुले झोके खेळायची.झोका खेळताना गाणी म्हटली जायची. झाडाखाली मुलांचा घोळका जमायचा. एखाद्याचा झोका पुढे गेला की दुसरा त्याला मागून ढकलायचा. कुणी पडले तर सगळे हसायचे, कुणाला लागले तर सगळे धावून जायचे. त्या छोट्याशा प्रसंगांमध्ये मैत्री होती, आपुलकी होती आणि बालपणाचा निरागस आनंद होता.आज झाडे आहेत, झोके बांधण्यास जागाही आहे; पण झोके खेळणारी मुले मात्र कमी झाली आहेत. मुलांच्या हातात झोक्याची दोरी नसून मोबाईल आहे. मैदानात खेळण्याऐवजी खोलीत बसून स्क्रीनवर खेळ खेळले जात आहेत.सण आहेत; पण सणांचा उत्साह कुठे आहे?आज जवळपास प्रत्येक सण साजरा केला जातो. घरात पूजा होते, शुभेच्छा दिल्या जातात, सोशल मीडियावर फोटो आणि संदेश पाठवले जातात. पण सणाचा जो सामूहिक आनंद पूर्वी अनुभवायला मिळायचा, तो हळूहळू कमी होत चालला आहे.पूर्वी सण म्हणजे माणसांनी माणसांना भेटण्याचा दिवस होता. आज सण म्हणजे अनेकदा मोबाईलवर शुभेच्छा पाठवण्याचा दिवस झाला आहे.शेजारी राहणाऱ्या व्यक्तीला प्रत्यक्ष भेटण्यासाठी वेळ नाही; पण सोशल मीडियावर त्याला शुभेच्छा देण्यासाठी काही सेकंद पुरेसे वाटतात. एकाच घरात चार माणसे बसलेली असतात, पण प्रत्येकाच्या हातात वेगळा मोबाईल आणि प्रत्येकाची नजर वेगळ्या स्क्रीनवर असते.गोकुळाष्टमीचा उत्साहही बदललापूर्वी गोकुळाष्टमी म्हणजे गावातील मुलांसाठी मोठा उत्सव असायचा. दहीहंडी, गोपाळकाला, भजन, गाणी आणि विविध खेळांमुळे गावात उत्साहाचे वातावरण असायचे. मुलांचे गट तयार व्हायचे. मोठी माणसे त्यांना प्रोत्साहन द्यायची.आजही दहीहंडी आणि गोकुळाष्टमीचे कार्यक्रम होतात; पण पूर्वीसारखा प्रत्येक घराचा सहभाग कमी झालेला दिसतो. उत्सवाचा प्रत्यक्ष आनंद घेण्यापेक्षा त्याचे फोटो काढणे, व्हिडिओ बनवणे आणि सोशल मीडियावर टाकणे याला अधिक महत्त्व मिळताना दिसते.गणेशोत्सवातही बदलाची चाहूलगणेशोत्सव म्हणजे पूर्वी गावातील एकजुटीचे प्रतीक होते. गणपतीची आरास, सामूहिक आरती, भजन, सांस्कृतिक कार्यक्रम, मुलांचे खेळ आणि रात्रीच्या गप्पा यामुळे गाव जागे राहायचे.आज गणेशोत्सव अधिक भव्य झाला आहे; सजावट वाढली, आधुनिक साधने आली, कार्यक्रम वाढले. पण काही ठिकाणी उत्सवाचा आत्मा कमी आणि दिखावा अधिक होत असल्याची भावना निर्माण होते.गणपतीसमोर सर्वांनी एकत्र बसून आरती करण्यापेक्षा अनेकांचे लक्ष मोबाईलच्या कॅमेऱ्याकडे असते. उत्सवाची आठवण मनात साठवण्यापेक्षा ती मोबाईलच्या गॅलरीत साठवण्याची प्रवृत्ती वाढली आहे.दिवाळीचा किल्ला आणि बालपणाच्या आठवणीदिवाळी आली की गावातील मुलांची लगबग सुरू व्हायची. घरांची साफसफाई, अंगणातील रांगोळी, आकाशकंदील, फराळ आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मातीचा किल्ला.मुलं माती आणायची, किल्ला बांधायची, त्यावर सैनिक ठेवायची, झाडे लावायची आणि आपल्या कल्पनेतील छोटंसं राज्य उभं करायची. त्या किल्ल्यात त्यांच्या कल्पनाशक्तीचा संसार असायचा.आज बाजारात तयार किल्ले, तयार सजावटीच्या वस्तू आणि तयार रांगोळ्या सहज मिळतात. सुविधा वाढल्या; पण स्वतःच्या हाताने काहीतरी तयार करण्याचा आनंद कमी झाला.पोळा : शेतकऱ्यांच्या भावनेचा सणपोळा हा ग्रामीण जीवनाचा आत्मा आहे. बैलांना आंघोळ घालणे, त्यांना सजवणे, शिंगांना रंग देणे, गळ्यात घुंगरू बांधणे आणि त्यांची मिरवणूक काढणे—हा सगळा सोहळा म्हणजे शेतकरी आणि त्याच्या पशुधनातील जिव्हाळ्याचे नाते.यांत्रिकीकरणामुळे शेतीचे स्वरूप बदलले आहे. ट्रॅक्टर आणि आधुनिक यंत्रांनी शेतीची अनेक कामे सोपी केली. पण त्याचबरोबर बैलांशी जोडलेले भावनिक नातेही काही प्रमाणात कमी झाले.पोळा साजरा होत असला तरी त्या सणामागची कृतज्ञता, श्रमाचा सन्मान आणि ग्रामीण जीवनाशी असलेली नाळ पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे.मकरसंक्रांत : तिळगुळाचा गोडवा कुठे हरवला?“तिळगुळ घ्या, गोड गोड बोला” या एका वाक्यात नात्यांचा संपूर्ण गोडवा सामावलेला होता. संक्रांतीला लोक एकमेकांच्या घरी जायचे, तिळगुळ द्यायचे आणि प्रेमाने गप्पा मारायचे.आज शुभेच्छा मोबाईलवरून जातात. संदेश पोहोचतो, फोटो पोहोचतो; पण माणूस मात्र माणसाच्या घरी पोहोचत नाही.होळी, धुळवड आणि सामूहिक आनंदहोळीच्या काही दिवस आधीपासूनच गावात उत्साह सुरू व्हायचा. होळीची तयारी, लाकूड जमा करणे, तरुणांचे गट, धुळवडीच्या दिवशी रंगात न्हाऊन निघणारी मुले आणि मोठी माणसे—सगळीकडे आनंदाचे वातावरण असायचे.आज धुळवड साजरी होते; परंतु पूर्वीसारखा सामूहिक सहभाग अनेक ठिकाणी कमी झाला आहे. प्रत्येक जण आपल्या मित्रांच्या छोट्या गटापुरता किंवा आपल्या डिजिटल जगापुरता मर्यादित होत चालला आहे.खेळ हरवले आणि स्क्रीन जिंकलीपूर्वी मुलांचे बालपण मैदानात घडायचे. लपंडाव, लगोरी, गोट्या, विटीदांडू, कबड्डी, खो-खो, दोरीच्या उड्या आणि झोके हे त्यांच्या आयुष्याचा भाग होते.आज मुलांना ही नावे माहिती असली तरी त्यातील अनेक खेळ प्रत्यक्ष खेळताना दिसत नाहीत. मोबाईलवरील गेम, व्हिडिओ आणि सोशल मीडिया यामुळे मुलांचा मोठा वेळ स्क्रीनसमोर जातो.यामुळे फक्त खेळ हरवत नाहीत; त्यासोबत मैत्री, संघभावना, संवाद, शारीरिक हालचाल आणि बालपणातील निरागस आनंदही कमी होत आहे.गावचा पार आणि झाडाखालील गप्पापूर्वी गावातील पार, मंदिराचा ओटा किंवा मोठ्या झाडाची सावली हे गावच्या संवादाचे केंद्र असायचे. मोठी माणसे अनुभव सांगायची, तरुण चर्चा करायचे आणि मुले खेळायची.आज त्या जागा आहेत; पण तिथे बसणारी माणसे कमी झाली आहेत.माणूस आता गावच्या पारावर नसून मोबाईलच्या स्क्रीनवर बसला आहे.मोबाईल दोषी की आपली सवय?मोबाईल किंवा तंत्रज्ञान स्वतःमध्ये वाईट नाही. मोबाईलने जग जवळ आणले आहे. शिक्षण, माहिती, संवाद आणि अनेक सुविधा त्यातून उपलब्ध झाल्या आहेत.प्रश्न आहे तो अतिरेकी वापराचा.आपण मोबाईलचा वापर करायचा की मोबाईलने आपला वापर करून घ्यायचा, हे ठरवण्याची वेळ आली आहे.तंत्रज्ञानाने आपल्याला जगाशी जोडले; पण त्याच वेळी आपल्या शेजारच्या माणसापासून, मित्रापासून आणि कुटुंबापासून दूर केले असेल तर त्याचा विचार करणे आवश्यक आहे.सण पुन्हा माणसांना जोडूयाअजूनही वेळ गेलेली नाही.नागपंचमीला पुन्हा झाडांवर झोके बांधूया.मुलांना पारंपरिक खेळ खेळू देऊया.दिवाळीत मुलांसोबत किल्ले बांधूया.गणेशोत्सवात सामूहिक आरती आणि सांस्कृतिक कार्यक्रम घेऊया.गोकुळाष्टमीला मुलांना पारंपरिक खेळांचा अनुभव देऊया.पोळ्याला बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करूया.संक्रांतीला केवळ मोबाईलवर शुभेच्छा न देता प्रत्यक्ष भेटूया.सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सणांना दिखाव्यापेक्षा माणुसकीची आणि खर्चापेक्षा सहभागाची जोड देऊया.सण मोठे नकोत, माणसे जवळ हवीत!सणांची खरी श्रीमंती मोठ्या सजावटीत, महागड्या कपड्यांत किंवा सोशल मीडिया पोस्टमध्ये नाही. ती आहे एकत्र बसलेल्या कुटुंबात, शेजाऱ्याच्या घरी गेलेल्या पावलांत, मुलांच्या हास्यात, झोक्यावरच्या गाण्यात आणि गावच्या पारावर रंगलेल्या गप्पांमध्ये.झोके राहिले... पण झुलणारे बालपण हरवले.गावे राहिली... पण गावपण हरवत चालले.सण राहिले... पण सणांचा सामूहिक आनंद कमी होत चालला.म्हणूनच आता पुन्हा एकदा मोबाईल हातात ठेवूनही माणूस मनातून हरवू न देण्याची गरज आहे.आपल्या मुलांना फक्त डिजिटल जग दाखवू नका; त्यांना आपल्या मातीचा सुगंधही अनुभवू द्या. त्यांना मोबाईलवरील खेळांसोबत गावच्या मैदानातील खेळही शिकू द्या. त्यांना सोशल मीडियावरील मित्रांसोबतच शेजारच्या मुलांशी मैत्री करू द्या.कारण—सण साजरे करण्यासाठी केवळ तारीख पुरेशी नसते;सण जगण्यासाठी माणसं एकत्र असावी लागतात.सण वाचवायचे असतील तर परंपरा जपा,परंपरा वाचवायच्या असतील तर माणसं जोडा,आणि माणसं जोडायची असतील तरकधीतरी मोबाईल बाजूला ठेवून गावच्या झाडाखाली पुन्हा एकदा झोका घ्या!



**संदीप वाकडे पाटील**
**मो. 9766992776**